भा. वं. गिरधारी
(लेखक प्रत

# मराठी 'शुद्ध' लेखनाचा मार्ग

भास्कर गिरधारी

विभा प्रकाशन
नाशिक—५.

# मराठी 'शुद्ध' लेखनाचा मार्ग

शुद्धलेखन, वृत्तलेखन, सारलेखन, निबंधलेखन आणि आस्वाद-लेखन या विषयांचे सुलभ मार्गदर्शन. शाळा, महाविद्यालये, वृत्तपत्र विद्या विभाग, मराठीचे अभ्यासक, अध्यापक आणि विद्यार्थीवर्ग यांना विशेष उपयुक्त.

# मराठी 'शुद्ध' लेखनाचा मार्ग

*

डॉ. भा. व्यं. गिरधारी
प्राचार्य
गोखले एज्युकेशन सोसायटीचे
कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
जव्हार (ठाणे) ४०१ ६०३.

*

विभा प्रकाशन
'विभा', पर्णश्री को-ऑप. सोसायटी,
नाशिक–४२२ ००५.

मराठी ‘ शुद्ध ’ लेखनाचा मार्ग :

*Marathi Shuddha Lekhanacha Marg*

डॉ. भास्कर गिरधारी

प्रकाशिका :

सौ. वसुधा भास्कर गिरधारी
विभा प्रकाशन,
‘ विभा ’, पर्णश्री को. ऑप. सोसायटी,
एच्. पी. टी. कॉलेज वसतिगृहाजवळ,
नाशिक – ४२२ ००५.

सर्वाधिकार : प्रकाशिकेच्या स्वाधीन

मुद्रक :

श्री. अनिल क्षत्रिय
मे. बी. वाय्. प्रिंटींग प्रेस
बी–३२, सातपूर, नाशिक–४२२ ००७.

प्रथम आवृत्ती :

१ मे, १९८५, महाराष्ट्रदिन
(संयुक्त महाराष्ट्र रौप्यमहोत्सवी वर्ष)

ग्रंथालयीन वर्गीकरण :

द्विबिंदु वर्गांक : नं. १५५ : ७
दशांश वर्गांक : ४९१ . ४६५

मूल्य :

वीस रुपये मात्र

## अनुक्रम —


| | |
|---|---|
| आरंभीचे निवेदन | दोन |
| पुरस्कार | चार |
| प्रस्तावना | सहा |
| शुद्धलेखन | ०१ |
| वृत्तलेखन | ३० |
| सारलेखन | ४५ |
| निबंधलेखन | ५६ |
| आस्वादलेखन | ५९ |
| अभ्यासाची साधने | ७० |
| शुद्धिपत्र | ७१ |


---


या पुस्तकास नाशिक येथील गोखले एज्युकेशन सोसायटीने रुपये १००० (५०० रु. अनुदान व ५०० रु. कर्ज) सानुग्रह अनुदान मंजूर केले. त्याबद्दल मन:पूर्वक आभार !


---

# आरंभीचे निवेदन

महाराष्ट्रात जानेवारी, १९८५ पासून सर्वत्र मराठीकरणाची मोहीम शासनाने हाती घेतलेली आहे. प्रत्यक्ष अनुभव असा की, मराठी शुद्धलेखनाबद्दल खात्री नसल्याने व "मागील पानावरून पुढे चालू" यासाठी जुन्या फायली तयार नसल्याने, मराठीकरणाची प्रक्रिया पाहिजे तसा जोर धरीत नाही. मराठी भाषिक, मराठी विषयाचा विद्यार्थीवर्ग, मुद्रक, मुद्रणशोधक या सर्वांनाच निदान काही शब्दांच्या शुद्ध लेखना–बद्दल संभ्रम पडतोच ! तो तपासून पाहण्यासाठी हाताशी साधन–सामुग्री तात्काळ उपलब्ध होत नाही. चर्चा करून शुद्ध लेखनातील चुकांची दुरुस्ती करून घेणे ही स्वागतार्ह प्रवृत्ती असूनही प्रत्यक्षात फारशी अंगी बाणलेली नसते. जाणकारांच्या बाबतीतही हाच संकोच आढळून येतो. त्यामुळे वृत्तपत्रविद्या विभागाचे वा ऐच्छिक मराठी विषय घेतलेले विद्यार्थी शुद्ध शब्दलेखन या कसोटीला फारसे उतरत नाहीत. अर्थात यात आमच्या मराठीच्या शिक्षकांचाही अपवाद नाही.

पीएच्. डी. साठी प्रबंध लिहीत असतांना प्रा. डॉ. ह. कि. तोडमल यांनी "लेखन कच्चे असो वा पक्के असो", शुद्धच लिहिण्याचा आग्रह धरला. तर या पुस्तकाचे प्रस्तावना–लेखक डॉ. राजाभाऊ गायधनी यांनी शुद्ध लेखनातील काटेकोरपणा, अनेक शब्दांची चर्चा करून पीएच्. डी. चा प्रबंध तपासताना शिकविला. त्यांची शुद्धलेखन शब्द नोंदवही मुक्तपणे वापरू दिली. प्रा. डॉ. स. गं. मालशे, डॉ. हे. वि. इनामदार व डॉ. चंद्रकांत वर्तक, बाळासाहेब सराफ यांनीही या पुस्तकातील विवेचन परिपूर्ण होण्यास अनेक उपयुक्त सूचना दिल्या. या सन्मार्गदर्शकांचा मी ऋणी आहे.

'मराठी अन्याय निवारण' परिषदेच्या कार्यास मित्रवर्य प्रा. सु. का. जोशी, पद्माकर मराठे, चंद्रकांत अडावदकर यांनी चालना देऊन अशा प्रकारच्या उपयुक्त लेखनाची सुप्त प्रेरणा दिली.

मराठीतील सर्वच लेखन–संदर्भात काही सुलभ मार्गदर्शन व्हावे या उद्दिष्टाने वृत्तलेखन, सारलेखन, निबंधलेखन व आस्वादलेखन इत्यादी लेख यात समाविष्ट केले आहेत.

आदरणीय डॉ. राजाभाऊ गायधनी यानी या ग्रंथास प्रस्तावना लिहिली. साहित्याचार्य प्राचार्य डॉ. मो. स. गोसावी, सेक्रेटरी, गोखले एज्युकेशन सोसायटी यांनी पुरस्कार लिहून व अनुदान देऊन उपकृत केले आहे. त्यांच्या ऋणातच मी राहू इच्छितो. या लेखनाचे अन्य स्वरूपात प्रकाशन करणाऱ्या 'शिक्षण संक्रमण' या नियतकालिकाच्या संपादकांचे, त्याचप्रमाणे सार्वजनिक वाचनालय, नाशिक, आमच्या संस्थेची वाचनालये यांच्या साहाय्याबद्दल मनःपूर्वक आभार मानतो. आमचे सन्मित्र मे. बी. वाय्. प्रेसचे संचालक श्री. अनिल क्षत्रिय यांनी अत्यंत किचकट मराठी शुद्धलेखनाचे काम स्वीकारून अचूक छापण्याचा निर्धार आणि उत्साह व्यक्त केला तो स्तिमित करणारा आहे. त्यांचेही मनःपूर्वक आभार.

मराठीच्या अभ्यासकांना, मुद्रणशोधकांना, पत्रकारबंधूंना या लेखनाचा उपयोग होईल अशी खात्री आहे. पुणे व एस्. एन्. डी. टी. विद्यापीठातील, वृत्तपत्रविद्या व मराठी विभागातील माझ्या सर्वच विद्यार्थ्यांची या लेखनामागे प्रेरणा आहे हे मी सद्भावपूर्वक नमूद करतो आणि हे पुस्तक माझ्या विद्यार्थ्यांनाच अर्पण करतो.

प्राथमिक व माध्यमिक विद्यालये, ज्येष्ठ व कनिष्ठ महाविद्यालये यातील मराठीचे तसेच हिंदी, इंग्रजी व अन्य भाषांचे अभ्यासक, वृत्तपत्रविद्या विभाग व मुद्रणकला विभाग, सर्व शिक्षक विद्यार्थी व मराठीचे जाणकार यांना या पुस्तकाचा विशेष लाभ होईल, म्हणून यंदाच्या रौप्यमहोत्सवी महाराष्ट्रदिनाच्या सुमुहूर्तावर हे प्रकाशन सविनय सादर करीत आहे.

दिनांक १ मे, १९८५ भा. व्यं. गिरधारी

# पुरस्कार

शुभास्ते !

महाराष्ट्रराज्य रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने शासनाने हाती घेतलेल्या मराठीकरणाची प्रक्रिया लक्षात घेऊन आमच्या संस्थेच्या जव्हार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भा. व्यं. गिरधारी यांनी व्यवहारोपयोगी मराठी पुस्तक लिहून पूर्ण केले ही गोष्ट खचितच अभिनंदनीय आहे.

साहित्याच्या आवडीपोटी स्वत: होऊन आपण ललित साहित्य वाचनाचा छंद जोपासू शकतो, वाङ्मयाभ्यास करू शकतो. त्यासाठी कला शाखेतील शिक्षणाची मुद्दाम वेगळी आवश्यकता नाही. परंतु प्रत्यक्षात उपयोजित मराठीच्या (Functional Marathi) मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता आहे.

मराठीमध्ये मसुद्यासह तयार फायली अद्याप कार्यालयात तयार होत नाहीत. त्यामुळे परंपरेने चालत आलेले इंग्रजी ड्राफ्टींग अनेकांना सोपे वाटते. साभिप्राय मराठी शब्दांची निवड करणे काहीसे कठीण होऊन बसते. म्हणूनच अशा प्रकारच्या पुस्तकांची निर्मिती या प्रक्रियेला हातभार लावणारी होऊ शकते.

"मराठी शुद्ध लेखनाचा मार्ग" या पुस्तकात डॉ. भा. व्यं. गिरधारी यांनी मराठी शुद्धलेखनाचे नियम, नेहमी होणाऱ्या चूका लक्षात घेऊन पुरेशा उदाहरणासह समजावून दिले आहेत. सार, आस्वाद, वृत्तात, निबंध लेखन यांचे शास्त्रशुद्ध व्यासंगी, विवेचन केले आहे. "अल्पाक्षर रमणीय" हा संस्कृत भाषेचा विशेष मराठीलाही आत्मसात करण्याची आवश्यकता लक्षात आणून दिली आहे.

निवडक, अर्थपूर्ण, थोडक्या शब्दांत आपले म्हणणे मराठीतून मांडता आले पाहिजे. त्यासाठी सारलेखन हे प्रकरण अभ्यासनीय झाले आहे. वृत्तांत–

लेखन प्रकरणही इतिवृत्त, मानपत्र, वृत्तलेखन या नित्याच्या सामोरे जावे लागणाऱ्या लेखन-प्रकारांच्या संदर्भात मार्गदर्शक झाले आहे.

या शिवाय पत्र, संवाद, दैनंदिनी, टीपा, टिप्पणी, जाहिरात, मुलाखत, रुपक, अनुवाद, दृक्श्राव्य माध्यमांसाठी लेखन इत्यादी विषयांच्या विविध लेखन प्रकारांच्या संदर्भात मार्गदर्शन देणारा या पुस्तकाचा पुढील भाग लिहून पूर्ण करावयाचाही प्रस्तुत लेखकाचा संकल्प आहे. तोही ते पूर्ण करतील अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

या पुस्तकाची उपयुक्तता लक्षात घेऊन गोखले एज्युकेशन सोसायटीच्या प्रकाशन उत्तेजन योजनेनुसार प्रकाशनासाठी संस्थेने ५०० रु. अनुदान व ५०० रु. कर्जाऊ रक्कम मंजूर केली आहे.

मराठी शुद्धलेखनासाठी हे पुस्तक शालेय, महाविद्यालयीन, वृत्तपत्र विभागाचे विद्यार्थी, मराठीचे अभ्यासक या सर्वांना निश्चित उपयुक्त ठरेल असा विश्वास व्यक्त करून पुढील भागाच्या प्रकाशनास शुभेच्छा व्यक्त करतो.

प्राचार्य डॉ. मो. स. गोसावी
(साहित्याचार्य)

# प्रस्तावना

गेल्या काही वर्षांत विद्यार्थ्यांच्या आणि इतर लोकांच्याही संबंधात शुद्धलेखन हा एक चिंतेचा विषय झाला आहे. ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, विरामचिन्हे, जोडाक्षरे अशा सर्वच प्रकारांमध्ये अनेक प्रकारच्या चुका आढळून येतात. संस्कृत भाषेचे अज्ञान आणि गेल्या काही वर्षांत झालेली शुद्धलेखनाची उपेक्षा यामुळे अशी परिस्थिती उत्पन्न झालेली दिसते. मध्यंतरी शुद्धलेखनाच्या नियमांमध्ये काही बदल झाले. त्याचीही अनेकांना माहिती दिसत नाही.

या पार्श्वभूमीवर डॉ. भा. व्यं. गिरधारी यांनी लिहिलेली शुद्धलेखना-संबंधीची ही छोटेखानी पुस्तिका आणि त्याला जोडलेले अन्य लेखन-संदर्भातील मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. शुद्धलेखनासंबंधी विस्तृत विवेचन करावे, अशी या लेखनामागे अपेक्षा नाही. नित्याच्या व्यवहारात लेखन करीत असतांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन करावे हा या प्रयत्नामागचा हेतू दिसतो. त्यामुळे विशेष विस्तार न करता अगदी मोजक्या पण वेचक शब्दांत त्यांनी सूचना दिल्या आहेत. प्रत्येक वेळी निरनिराळ्या प्रकारची उदाहरणे दिली आहेत. कोणत्या प्रकारच्या चुका वारंवार होतात, ते लक्षात घेऊन त्यानुसार मार्गदर्शन केले आहे. डॉ. गिरधारी मराठीचे प्राध्यापक असल्यामुळे आणि विद्यार्थ्यांचे लेखन त्यांच्या नजरेखालून जात असल्यामुळे नेमके काय आणि कसे सांगावे याची योग्य कल्पना त्यांना आहे. काही नित्योपयोगी शब्दांच्या याद्याही त्यांनी पुरवल्या आहेत. अशुद्ध उतारे शुद्ध करून दाखवले आहेत. सार, वृत्त, निबंध, आस्वाद इत्यादी महत्त्वपूर्ण लेखांची पुस्तीही त्याला जोडली आहे. त्यामुळे आकाराने लहान असले तरी सर्वांगपरिपूर्ण असे स्वरूप या पुस्तकाला आले आहे. या विषयाचा अधिक अभ्यास करू इच्छिणारांसाठी त्यांनी काही पुस्तकांची नावेही सुचवली आहेत.

डॉ. गिरधारी यांचा हा प्रयत्न कौतुकास्पदच म्हणायला हवा. त्यासाठी त्यांनी पुष्कळ कष्टही घेतलेले दिसतात. विद्यार्थ्यांनी व मराठीच्या सर्वच अभ्यासकांनी या पुस्तकाचा नीट उपयोग करून घेतला व त्यांच्या लेखनात थोडीफार प्रगती झाली तर लेखकाचे प्रयत्न सफल झाले, असे म्हणता येईल.

सह्या त्र्यं. गं. गायधनी

# मराठी शुद्धलेखन

## भूमिका

शुद्धलेखन ही तशी मुळात अवघड गोष्ट नाहीच. पण आपल्याकडे व्याकरण आणि शुद्धलेखन म्हटले की त्याचा फार मोठा धाक निर्माण होतो, 'बाऊ' केला जातो. पण थोडे मनावर घेतले, काळजीपूर्वक नियम लक्षात घेतले, विरामचिन्हे समजावून घेतली की लेखन शुद्धीची चिंता दूर होते. उलट शुद्ध गद्यलेखन करता येते आणि डोळस जाणकार मराठी माणसालाही तुमच्या लेखनातील उणिवा, दोष दाखवायला जागा राहत नाही. मात्र त्यासाठी येथे केलेले शुद्धलेखनाचे विवेचन समजावून घेणे अगत्याचे आहे. त्या अनुषंगाने दिलेले स्वाध्याय मनःपूर्वक आणि परिश्रम-पूर्वक सोडविणे आवश्यक आहे.

## शुद्धलेखनातील शुद्धाशुद्धता

शुद्धलेखन हा व्याकरणाचाच एक भाग असल्यामुळे व्याकरणातील नियमांना अनुसरून केलेले लेखन म्हणजेच शुद्ध-लेखन होय. आपण नेहमीच लिहीत असतांना शब्दलेखनात अनेक चुका करीत असतो, किंवा कळत, नकळत या चुका आपल्या हातून होत असतात. चुकीची जाणिवही कित्येकदा लिहिणाऱ्याला

नसते. अनेकदा अनवधानाने व सवयीने आपण चुकीचेच शब्द लिहीत असतो. पण शेवटी चूक ही चूकच ! म्हणून वेळच्या वेळी, निदान योग्य वेळी, तत्परतेने, प्रामाणिकपणे लेखनातील शुद्धाशुद्ध विवेक करायला हवा. साधारणपणे आपल्या कोणकोणत्या शब्द–लेखनाच्या संदर्भात चुका होतात ते लक्षात घेऊन अशा शब्दांची स्वतंत्र शुद्ध व अशुद्ध रुपे येथे नमूद करावयाची आहेत. शुद्ध–लेखनातील जुन्या, नव्या नियमांबाबतच्या संभ्रमातून हे घडत नाही. अनेकदा पुस्तकांना जोडलेल्या शुद्धिपत्रातूनही या चुका का होतात यांची कल्पना आपल्याला येऊ शकते. लेखन मग ते कच्चे असो की पक्के ते काळजीपूर्वक सावधानतेने शुध्दच करायला हवे म्हणजे या लेखनदोषांना सामोरे जावे लागत नाही.

## शुद्धलेखन म्हणजे काय ?

'मराठी भाषेने देवनागरी लिपीचा स्वीकार केला आहे. देवनागरीमध्ये मराठी शब्द किती प्रमाणात उच्चाराशी प्रामाणिक राहतात याचा विचार म्हणजे मराठीच्या शुद्धलेखनाचा विचार होय' असे डॉ. लीला गोविलकर यांनी 'मराठीचे व्याकरण' या ग्रंथात प्रतिपादन केले आहे (पृ. २२३). शुद्धलेखन हे प्रामुख्याने वर्ण व वर्णमाला यांच्याशी निगडित असते. भाषेतील निधी म्हणजे शब्दांचा कोश व विधी म्हणजे भाषेतील व्यवहार, व्यवस्था कालांतराने सतत बदलत राहते. भाषाशास्त्रीय दृष्टीने तर हे होणे अपरिहार्य व बरोबरच आहे पण भाषेबरोबरच भाषेचे शुद्ध-लेखनही सतत बदलत जाते. व्याकरणाने भाषेच्या, शब्दांच्या ज्या रुपाला मान्यता दिली व जी रूपे भाषिक व्यवहारात रुढ आहेत, तीच रुपे, त्यांचेच लेखन आपण शुद्ध मानतो, उदा. :– 'म्या'

‘त्वा’ ही एकेकाळची शिष्टसंमत रूपे आज प्रचारात नाहीत. भाषेतील उच्चारणांशी शुद्धलेखन संबद्ध असल्याने कालपरत्वे उच्चारानुसार शुद्धलेखनही बदलतांना दिसते. व्याकरणातील शुद्धाशुद्धतेचा शुद्धलेखनाशी जसा थोडा संबंध असतो तसाच भाषा शुद्धीचाही शुद्धलेखनाशी थोडाच संबंध असतो. भाषाशुद्धीकरणाची मोहीम हाती घेतलेल्यांना परभाषेतील शब्द टाळावेत असे वाटेल, पण शुद्धलेखनाचा या गोष्टींशी फारसा संबंधच येणार नाही. फार तर अशा शब्दातील ऱ्हस्व-दीर्घ काटेकोर नियमांमध्ये बसविता येत नाहीत या गोष्टी पुरताच येईल. उदा. :– ‘कुडता’ हा शब्द वापरावा की विदेशी म्हणून टाळावा हा विवेक भाषाशुध्दी प्रकरणात येईल. शुध्दलेखनाचा संबंध एवढाच की यातील ‘क’ चा उकार कोणता असावा. तेव्हा शुध्दलेखन हे प्रामुख्याने लेखनातील शुध्दता दाखविण्यासाठी असते. म्हणूनच व्याकरणकार मोने यांनी ‘शुध्दलेखन’ या ऐवजी ‘लेखन-शुध्दी’ प्रकरण लिहिले आहे. उच्चारणांशी लेखनशुध्दीचा संबंध त्यांनी मानला आहे.

मो. के. दामले या व्याकरणकारांच्या दृष्टीने बोलणेच लेखनानुसारी असावे, कारण लेखन—स्वरूपात अधिक सुव्यवस्था निश्चिती व सफाई असते. ‘आधी बोलले गेले व मगच ते लेखनविष्ठ झाले’ हाच सिध्दांत शुध्दलेखनात उच्चारानुसारी लेखन मानण्याच्या प्रक्रियेत पाळला गेलेला दिसतो. म्हणून मो. के. दामले यांचे “एकंदरीत भाषासंग्रह, स्पष्टीकरण व सामान्य नियमांचे आविष्करण हो वैयाकरणाची मूळ कर्तव्यें होत. भाषेचे नियमन किंवा बंधन म्हणजे अपवादक गोष्टीस सामान्य नियमांचेच वळण देणे हा अव्यापारेषु व्यापार होय”. (पृ. ७८) हे मत स्वीकारता येत नाही. कारण लेखनातील

शुध्दाशुध्दता ठरवितांना सामान्य लोकांचे उच्चारण हाच एकमेव प्रमुख आधार आहे.

डॉ. लीला गोविलकरांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे मराठी लेखनातील हा शुध्दाशुध्दतेचा विवेक करण्यासाठी पुढील सहा प्रमुख साधनांचा विचार करावा लागतो. १) उच्चार २) व्युत्पत्ती ३) लोकव्यवहार किंवा प्रचार ४) लोकपरंपरा किंवा त्या उच्चाराचा इतिहास ५) लोकव्यवहार व परंपरा या मधून व्यक्त झालेली त्या विशिष्ट भाषेतील प्रवृत्ती ६) सोय किंवा सोपेपणा. एखाद्या ठराविक शब्दाचा उच्चार कसा केला जातो ? त्यातील विविध लकबी कोणत्या ? त्या शब्दाची व्युत्पत्ती नेमकी काय असू शकेल ? तो शब्द आज कसा लिहिला जातो ? पूर्वी कसा लिहिला जात होता ? भाषेच्या प्रवृत्तीशी तो शब्द मिळता-जुळता आहे की नाही ? त्याच्या लेखनात सुलभतेऐवजी अकारण बोजडपणा, क्लिष्टता आहे काय ? या सर्वच दृष्टीने शब्दांचा विचार करून मगच त्यांचे लेखन ठरत असते.

## शुद्धलेखनाची नियमावली

मराठी शुध्दलेखनाच्या संदर्भात प्रामुख्याने ऱ्हस्व–दीर्घ, अनुस्वार, शिवाय अंन्य काही गोष्टी यांचा विचार करावा लागतो. त्यासाठी मराठी महामंडळाने तयार केलेल्या शुध्दलेखन नियमांचा आधार अधिकृत म्हणून घेणे आवश्यक आहे. ते नियम सोदाहरण समजावून घेणे आवश्यक आहे. शिवाय अपवाद मानले गेलेले शब्दही स्वतंत्रपणे लक्षात घेतले पाहिजेत.

दि. २० सप्टेंबर, १९६२ रोजी शासनाने एका ठरावाने मराठी साहित्य महामंडळाने पुरस्कारलेल्या शुध्दलेखन विषयक

नियमांना मान्यता देऊन हे नियम ताबडतोब अंमलात आणण्याचा आदेश दिला. मराठी साहित्य महामंडळाच्या ज्या लेखनविषयक १८ नियमांना शासनाने मान्यता दिली ते नियम पुढीलप्रमाणे आहेत.

## १) अनुस्वार

नियम १ :- स्पष्टोच्चारित अनुनासिकांबद्दल शीर्षबिंदू द्यावा. उदा.- तंटा, चिंच, आंबा, गंगा, घंटा, पंडित. अनुनासिकाबद्दल विकल्पाने परसवर्ण लिहिण्यास हरकत नाही, पण मराठी (देशी) शब्दांच्या बाबतीत अनुस्वार शक्य तो परसवर्णाने दाखवू नये. मात्र संस्कृतातील शब्द मराठीत जसेच्या तसे आले आहेत ते (तत्सम) शब्द परसवर्णाने लिहावयास हरकत नाही.

नियम २ :- य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल संस्कृतप्रमाणे केवळ शीर्षबिंदू द्यावा. उदा.- सिंह, संयम, मांस, संवाद, संसार, संस्था, संस्कार.

नियम ३ :- नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा. उदा. लोकांना, मुलांनी, तुम्हांस, लोकांसमोर, घरांपुढे. हा अनेकवचनसूचक अनुस्वार अस्पष्ट उच्चार असतानाही द्यावा. उदा : मुलांना, घरांस, गावांमध्ये, त्यांना, त्यांच्यामुळे इ.

नियम ४ :- वरील नियमांव्यतिरिक्त कोणत्याही कारणांसाठी व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार देऊ नयेत

थोडक्यात सांगावयाचे तर स्पष्टोच्चारित अनुनासिके व अनेकवचनी नामे व सर्वनामे यांच्या सामान्यरूपावर येणाऱ्या अनुस्वारांशिवाय आता कोठेही अनुस्वार देण्याची गरज नाही.

## २) ऱ्हस्वदीर्घ

नियम ५ :– तत्सम (ऱ्हस्व) इकारान्त आणि उकारान्त शब्द दीर्घान्त लिहावेत. उदा. : कवी, मती, गती, गुरु. इतर शब्दांच्या अंती येणारा इकार व उकार दीर्घ लिहावा. उदा. पाटी, जादू, पैलू, विनंती, ही (शब्दयोगी अव्यय)

अपवाद : आणि, नि.

स्पष्टीकरण– परंतु, यथामति, तथापि, अद्यापि, इत्यादि, प्रभृति, तत्रापि वगैरे तत्सम अव्यये ऱ्हस्वान्तच लिहावीत. तसेच सामासिक शब्दांतही तत्सम (ऱ्हस्व) इकारान्त व उकारान्त शब्द पूर्वपद असताना ऱ्हस्वान्तच लिहावेत. उदा. बुद्धिवैभव, कविराज, गतिमान, गुरुवर्य.

मी, तू, जी, पी, धू, पू अशा तऱ्हेचे एकाक्षरी शब्द दीर्घ लिहावेत. तू, ही, जी, ती, या सर्वनामांच्या सामान्य रूपांत अन्त्य स्वर ऱ्हस्व उच्चारला जातो, म्हणून तो ऱ्हस्वच लिहावा. उदा. तुला, हिचा, जिला, तिचा.

मात्र 'स', 'ते' व 'त' प्रत्यय लावतांना वरील शब्दांतील अन्त्य स्वर दीर्घच राहतो. उदा. तूस, हीस, तीते, जीत.

नियम ६ :– (दीर्घ) ईकारान्त व ऊकारान्त शब्दांतील उपान्त्य इकार व उकार ऱ्हस्व लिहावे:

उदा. माहिती, हुतुतू, सुरू.
अपवाद – नीति, भीति, रीति, कीर्ति इत्यादी तत्सम शब्द. (मात्र या शब्दांचा अन्त्य इकार आता दीर्घ (ई) होईल.)

नियम ७ :– अकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार, उकार दीर्घ लिहावेत. उदा. गरीब, वकील, वीट, सून, वसूल.
अपवाद : ऱ्हस्वोपान्त्य अकारान्त तत्सम शब्द.
उदा. गुण, विष, मधुर, प्रचुर, मंदिर, अद्‌भुत, अंकुश इ.

नियम ८ :– उपान्त्य दीर्घ ई – ऊ असलेल्या शब्दांचा उपान्त्य इकार – उकार उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा. उदा. गरिबास, वकिलांना, सुनेला, वसुलाची, नागपुरास, जिवाला. अपवाद :– दीर्घोपान्त्य तत्सम शब्द : उदा. शरीरास, गीतेत, सूत्रात, जीवास (प्राणी या अर्थी). सामान्यतः तत्सम शब्दाच्या मूळ रुपात बदल करू नये.

## ३) किरकोळ

नियम ९ :– पूर हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्रामनामास लावताना दीर्घोपान्त्य लिहावा. उदा. नागपूर, संबळपूर, तारापूर, वैजापूर, सोलापूर इत्यादी. 'पू' हे अक्षर दीर्घ लिहावे.

नियम १० :– कोणता, एखादा ही रुपे लिहावीत. कोणचा, एकादा ही रूपे लिहू नयेत.

नियम ११ :– हळूहळू, मुळूमुळू, खुटूखुटू या शब्दांतील दुसरा व चौथा स्वर दीर्घ लिहावा.

नियम १२ :- एकारान्त नामाचे सामान्यरूप याकारान्त करावे. उदा.– करण्यासाठी, फडक्यांना, पाहण्याला इत्यादी. एकारान्त सामान्यरूपे करू नयेत. पूर्वी एकारान्त शब्दप्रयोग करण्याच्या प्रघातानुसार 'आमचे घरी आपले मुलाबाळांसह अगत्य येणेचे करावे' असे लिहीत पण आता याकारान्त रूपे वापरून 'आमच्या घरी आपल्या मुलाबाळांसह अगत्य येण्याचे करावे (किंवा यावे)' असे लिहावे लागेल.

नियम १३ :- लेखनात पात्राच्या किंवा वक्त्याच्या तोंडी बोलण्याची भाषा घालावी लागते. त्यावेळी तिचे स्वरूप बोलण्यातील उच्चाराप्रमाणे असावे. एकारान्त नपुसकलिंगी शब्दांचे अकारान्त रूप योजावयाचे झाल्यास अशा अकारान्त रुपाच्या अन्ती अनुस्वार दिलाच पाहिजे. उदा. 'त्याचे व्याख्यान चांगले झाले' ऐवजी 'त्याचं व्याख्यान चांगलं झालं'. वक्त्याच्या तोंडचेच उद्गार असे लिहावेत. इतर ठिकाणी असे लिहू नये.

नियम १४ :- मराठीत रूढ झालेले तत्सम शब्द अकारान्त लिहावेत. क्वचित, कदाचित, अर्थात, अकस्मात, विद्वान इत्यादी.

नियम १५ :- केशवसुतपूर्वकालीन पद्य व विष्णुशास्त्री चिपळूणकर-पूर्वकालीन गद्य यांतील उतारे छापताना ते मुळानुसार छापावे. तदनंतरचे (केशवसुत व चिपळूणकर यांच्या लेखनासह) लेखन मराठी साहित्य महामंडळाच्या प्रस्तुत लेखनविषयक नियमांस अनुसरून छापावे.

नियम १६ :- राहणे, पाहणे, वाहणे, अशी रूपे वापरावीत. रहाणे-राहाणे, पहावे-पाहाणे अशी रूपे वापरु नयेत. आज्ञार्थी प्रयोग

करताना 'राहा, पाहा, वाहा' यांच्याबरोबरच 'रहा, पहा, वहा' ही रुपे वापरण्यास हरकत नाही.

नियम १७ :- 'इत्यादी' व 'ही' (अव्यय) हे शब्द दीर्घान्त लिहावेत. 'अन्' हा शब्द व्यंजनान्त लिहावा.

नियम १८ :- पद्यात वृत्ताचे बंधन पाळताना ऱ्हस्वदीर्घाच्या बाबतीत हे नियम काटेकोरपणे पाळता येणे शक्य नसल्यास कवीला तेवढ्यापुरते स्वातंत्र्य असावे.

मराठी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखनाच्या या १८ नियमांवरून पुढील महत्त्वाच्या गोष्टी ठळकपणे जाणवतात.

१) मराठीतील लेखन हे शक्यतो उच्चारानुसारी असावे.

२) स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा.

३) व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार देऊ नयेत.

४) नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्य रूपांवर अनुस्वार द्यावा.

५) मूळ शब्दांतील अक्षरे यथोच्चार ऱ्हस्व किंवा दीर्घ लिहावीत.

६) ऱ्हस्व 'इ' कारान्त व 'उ' कारान्त तत्सम शब्द वाक्यात दीर्घान्त लिहावेत.

७) विभक्तिप्रत्यय जोडताना अन्त्य ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो.

८) तत्सम इकारान्त व उकारान्त शब्द समासात पूर्वपदी ऱ्हस्वान्तच लिहावेत.

९) अकारान्त तत्सम शब्दांतील उपान्त्य स्वर ऱ्हस्व 'इ' किंवा 'उ' असल्यास तो ऱ्हस्व लिहावा.

१०) दीर्घोपान्त्य तत्सम शब्द दीर्घच लिहावेत.

११) व्यंजनान्त तत्सम शब्द अकारान्त लिहावेत.

आपण लिहीत असतांना शब्दांच्या लेखनात अशुद्धता बरीच आढळते. याला कारण शुद्धलेखनाच्या अधिकृत (उपरोक्त) नियमांविषयीचे अज्ञान हे असले तरी इतरही अनेक कारणे सांगता येतील. त्याचे सोदाहरण विवेचन पुढे दिले आहे.

१) वर्णांचा क्रम बदलल्यामुळे होणाऱ्या चुका (शुद्ध रूपे कंसात दिली आहेत).

समात्प (समाप्त), शब्द (शद्ब), चमत्त्कार (चमत्कार)

२) संस्कृत भाषेच्या अज्ञानामुळे होणाऱ्या चुका.

अभिष्ट (अभीष्ट), अनावृत्त (अनावृत), आशिर्वाद (आशीर्वाद)

३) अयोग्य उच्चारामुळे होणाऱ्या चुका

कल्यान (कल्याण), द्रुष्ट (दुष्ट), मानूस (माणूस)

४) हिन्दी भाषेच्या संपर्कामुळे होणाऱ्या चुका.

सफेद (सफेत), दूसरा (दुसरा), ज्यादा (जादा)

५) विसर्गाच्या संभ्रमातून होणाऱ्या चुका.

अंध:कार (अंधकार), अंतस्थ (अंत:स्थ), मातोश्री (मातु:श्री)

६) इष्ट–इष्ठच्या संभ्रमातून होणाऱ्या चुका.

उत्कृष्ठ (उत्कृष्ट), कनिष्ट (कनिष्ठ), विशिष्ठ (विशिष्ट)

७) श–ष–स च्या संभ्रमातून होणाऱ्या चुका.

विषद (विशद), सुश्रुषा (शुश्रुषा), विषेश (विशेष)

८) ऊ–वू च्या संभ्रमातून होणाऱ्या चुका.

जेऊन (जेवून), धुवून (धुऊन), गावून (गाऊन)

९) वर्णविपर्ययातून होणाऱ्या चुका.

चिटकविणे (चिकटविणे), सहाजिक (साहजिक), फाकट (फाटक)

१०) अ–आ च्या संभ्रमातून होणाऱ्या चुका.

आर्वाचीन (अर्वाचीन), अहेर (आहेर), अवश्यक (आवश्यक)

## काही लक्षणीय शब्दांचा निधी

१) उपसर्गघटित शब्दांत ऱ्हस्व इकार व उकार.

अति– अतिस्नेह, अतिरेक, अतिशयोक्ती, अतिशय.

अधि– अधिकार, अधिमती, अधिदैवत.

अनु– अनुरूप, अनुभव.

अभि– अभिमान, अभिधान, अभिज्ञ, अभिव्यक्ती.

नि– निधन, निमग्न, निबंध.

परि– परिसमाप्ती, परिवर्तन, परिच्छेद.

प्रति– प्रतिबिंब, प्रतिशब्द, प्रतिपादन, प्रतिवृत्त.

सु– सुदिन, सुप्रभात, सुगंध.

वि– विनाश, वियोग, विख्यात.

उत्-द्– उत्तेजन, उद्घाटन, उत्कर्ष.

उप– उपक्रम, उपग्रह, उपकार.
दुस्-दुर्– दुर्गुण, दुराचार, दुःस्थिती.
निस्-निर्– निर्गुण, निराकार, निष्कारण, निर्बंध.

२) संस्कृतमधील कर्म. भू. धा. विशेषणातील 'इत' प्रत्यययुक्त शब्द, ऱ्हस्व उपान्त्य इकारासह लिहावेत. उदा. : पुष्पित, परिमित, फलित, वंदित, आकर्षित, आनंदित, विभूषित, विकसित, समर्पित, प्रज्वलित, विचलित इ. या प्रकारच्या विशेषणांतील इकार व उकार मराठीत ऱ्हस्व वा दीर्घ मूळ विशेषणाप्रमाणे लिहावेत.

उदा. : जि – जित = पराजित, कष्टार्जित
भू – भूत = अनुभूत
स्था–स्थित = उपस्थित, प्रतिष्ठित

३) विध्यर्थी विशेषणांतील 'अनीय' प्रत्यययुक्त शब्दांतील 'ई' कार दीर्घ लिहावेत.

उदा : वंदनीय, मननीय, वाचनीय, रक्षणीय, प्रेक्षणीय, रमणीय, पूजनीय, प्रशंसनीय, माननीय इत्यादी.

४) 'इक' प्रत्यययुक्त शब्दांतील इकार ऱ्हस्व लिहावा.

उदा : धार्मिक, शैक्षणिक, भौगोलिक, आर्थिक, ऐतिहासिक, औद्योगिक, सामाजिक, वैचारिक, त्रैमासिक, बौद्धिक, पारंपारिक, मौखिक, वैदिक, धनिक, पडिक, रसिक, पथिक, वैमानिक, नागरिक, साहजिक इत्यादी.

५) ईय व ईन प्रत्यययुक्त शब्द दीर्घ ईकारयुक्त लिहावेत.
उदा : शास्त्रीय, भारतीय, राष्ट्रीय, एतद्देशीय इ.
कालीन, ग्रामीण, विद्यालयीन, कार्यालयीन इ.

६) संस्कृतमधून आलेले दीर्घ ईकारान्त व ऊकारान्त शब्द दीर्घच लिहावेत. त्यांचे दीर्घत्व कायम राहते. उदा. : नदी, देवी, जननी, पत्नी, श्री, पृथ्वी, अग्रणी, इ.
वधू, चमू, भू, चंपू इ.

७) रफारापूर्वीचा ईकार व ऊकार सामान्यत: दीर्घच लिहावा. उदा : दीर्घ, उत्तीर्ण, जीर्ण, संकीर्ण, वीर्य, मार्गशीर्ष, सूर्य, पूर्व, संपूर्ण, चूर्ण, धूर्त, मूर्ख.
अपवाद– दुर्ग, खुर्ची, तुर्क इ.

८) साधित शब्दांतील उकार व इकार प्रत्ययानुसार लिहावेत. उदा : लाजाळू, झोपाळू, पोटभरू, झाडू, लढाऊ, विकाऊ, जळाऊ, सोशीक, खर्चीक, लवचीक, जाणीव, उणीव, नेणीव, चकचकीत, घडीव, पाळीव, फुटीर, फुगीर, चढाई, लढाई, लेखणी, वर्तणूक, भरती इ.

९) संस्कृतमधील इन्नन्त शब्द दीर्घ ईकारान्त लिहावेत. उदा : धनी, पक्षी, विद्यार्थी, प्राणी, दंडी, प्रभावी, तेजस्वी, ब्रह्मचारी, ग्रामवासी, वनवासी, भाग्यशाली, मध्यवर्ती, महत्त्वाकांक्षी, ध्येयवादी, जीवनदायी, अनुयायी.
उपरोक्त शब्दांची स्त्रीलिंगी रुपे –
पक्षिणी, विद्यार्थिनी, तेजस्विनी, ब्रह्मचारिणी, सुवासिनी, ज्ञानवर्धिनी, मर्दिनी.

१०) विभक्तीचे प्रत्यय, शब्दयोगी अव्यय, समास यांच्या दीर्घत्वावर परिणाम होत नाही.
उदा : पत्नीने, वधूला, देवीचा, नदीकिनारी, वधू-वर, भूपती, बालचमू इ.

११) संधी नियमानुसार दीर्घ इकार व उकार लिहावेत.

उदा : कवीश्वर, गुरूपदेश, कवीच्छा, भानूदय, रवींद्र, यतीश, परीक्षा, प्रतीक्षा.

१२) व्यंजनांमध्ये दीर्घ इकार वा उकार समाविष्ट झालेले शब्द दीर्घ लिहावेत.

उदा : जगदीश, वागीश्वरी, समीक्षा, निरीक्षण.

१३) 'द्वि' समासातील ई दीर्घ लिहावा.

उदा : शुद्धीकरण, अंगीकार, स्वीकार, वर्गीकरण, सैनिकी–करण, एकीकरण, समीकरण, एकत्रीकरण.

१४) दोन अक्षरी शब्द अन्त्य जोडाक्षर असल्यास उपान्त्य इकार व उकार ऱ्हस्व असतात.

उदा : किल्ला, कित्ता, कुत्रा.

१५) संस्कृतमधून आलेले व मराठीत आत्मसात न झालेले शब्द दीर्घच राहतात. उदा : सूत्रात, गीतेत इ.

१६) दोन अक्षरी शब्द अन्त्य स्वर ऱ्हस्व अकारान्त असतांना उपान्त्य इकार व उकार सामान्यतः दीर्घ असतात.

उदा : खीर, रीत, फूल, धूर, चीर, बीज, तीळ, शीव.

१७) अनेकवचनी, विभक्तीचे प्रत्यय वा शब्दयोगी अव्यय जोडून आले असतांना हेच इकार व उकार ऱ्हस्व होतात.

उदा : विटा, चुली, मुले, शिरा, खिरीत, फुलांचा, तुपाने, पिठावर, चुलीपुढे इत्यादी.

१८) संस्कृतमधून आलेल्या तत्सम शब्दांतील उपान्त्य इकार व उकार मुळात ऱ्हस्व असल्यास मराठीतही ऱ्हस्वच राहतात.

उदा : गुण, विष, शिव, शिर, सुत. जे मूळात संस्कृतमध्ये दीर्घ ते अर्थात दीर्घच राहतील. उदा : शूर, वीर, क्रूर, भूषण इत्यादी.

१९) दोन अक्षरी शब्द : अन्त्य स्वर दीर्घ, अशा वेळी उपान्त्य इकार व उकार सामान्यतः ऱ्हस्व लिहावेत.

उदा : विडा, फिका, सुरा, दुवा, दिवा, तुरा इ.

* हाच नियम विशेषनामांनाही लागू आहे.

उदा : जिवा, शिवा, भिवा इ.

* मात्र संस्कृतमधून आलेले तत्सम शब्द मुळाप्रमाणे लिहावेत.

उदा : वीणा, क्रीडा, सीमा, सीता, भीमा इ.

२०) दोन अक्षरी शब्द : अन्त्य व उपान्त्य इकार, उकार उपान्त्य ऱ्हस्व व अन्त्य दीर्घ लिहावे.

उदा : किती, पिसू, फुली, भुई, कुंकू, गुढी, चिकी, विंचू, मुंगी, कुडी, पिढी, कुणी इ.

काही विशेषनामे –

उदा : भिकू, विसू, विजू, विनू, दिनू इ.

२१) तीन अक्षरी शब्द : अन्त्य इकार व उकार सामान्यतः दीर्घ लिहावेत.

उदा : पडवी, राहुटी, पणती, सुकाणू, पाखरू इ.

२२) अनुस्वारयुक्त इकार व उकार सामान्यतः ऱ्हस्व लिहावेत. उदा : चिंच, नारिंग, कुंचा, गुंड, सुरुंग, सुंठ, उंट, तुरुंग, कुंड, गुंग, बाशिंग.

२३) काही अनेकाक्षरी शब्दांतील 'इ' कार व 'उ' कार : उदा : शिकेकाई, दालचिनी, पुष्करिणी, कोशिंबीर, इंद्रायणी, राजधानी, सरोजिनी, सौदामिनी, भद्रकाली, कवयित्री.

२४) नामसाधित (तद्धित) अल्पत्वदर्शक शब्दांचे लेखन : उदा : डोंगरी, विळी, वाडी, पळी, वाटी, टोपली, तबकडी, चांदुकली, धनुकली, पाखरू, शिंगरू, मेंढरू, वासरू.

२५) अन्य भाषेतील शब्द त्या लकबीनुसार ऱ्हस्व-दीर्घ लिहावेत. उदा : फकिरी, गाफिल, हकीम, दिक्कत इ.

## शब्दसिद्धी प्रकरण

संस्कृतमधून जसेच्या तसे, अविकृत, कोणताही बदल न होता आलेल्या शब्दांना 'तत्सम शब्द' म्हणतात. उदा : हस्ती, संस्कार, मंत्र, सत्य, बंधू, माता, पिता, पुण्य, स्वर्ग, पवित्र, श्रोता, पूजा, कन्या, संकल्प, इत्यादी शब्द तत्सम आहेत.

संस्कृत भाषेमधून बदल होऊन आलेल्या शब्दांना 'तभ्दव शब्द' म्हणतात. उदा : भाऊ, घर, पंख, चाक, दूध, कान, पान, ओठ, आग, चोच पाच हे शब्द अनुक्रमे भ्रातृ, गृह, पक्ष, चक्र, दुग्ध, कर्ण, पर्ण, चक्र, ओष्ट, अग्नि, चंचू, पंच या संस्कृत शब्दापासून उद्‌भवलेले आहेत. जे शब्द इतर भाषेतून आलेले असतात त्यांना 'विदेशी शब्द' म्हणतात. उदा : छावणी, बटाटा,

टेबल, टेप, रेडिओ, कुमक, करामत, माहित्ती इ. जे शब्द अन्य कोणत्याही भाषेतून आलेले आहेत असे व्युत्पत्तीवरून म्हणता येणार नाही व खास मराठीतच ते तयार झालेले आहेत अशा शब्दांना 'देशी शब्द' म्हणतात. उदा : आकाश, निवारा इ. मूळ शब्दांच्या किंवा धातूंच्या मागे एक वा अधिक अक्षरे लावून जे शब्द बनतात त्यांना 'उपसर्गघटित शब्द' म्हणतात. उदा : अ, व, आ, उ, त्, अधि, दूर, प्र, प्रति, उप, नि, भर, ना, बिन, बे, हे उपसर्ग आहेत व यावरून अनेक शब्द उत्कर्ष, अवकृपा, प्रगती, उन्नती यासारखे तयार झालेले आहेत. उपवास, आजन्म, आमरण, प्रदोष, परिस्थिती, सन्मुख, निरभ्र, बेजबाबदार, नापसंत, अनोळखी, दुर्जन, अवलक्षण ही त्याची काही आणखी उदाहरणे आहेत.

काही शब्दांच्या किंवा धातूंच्या पुढे एक वा अधिक अक्षरे लावून जे शब्द तयार होतात त्यांना 'प्रत्ययघटित शब्द' असे म्हणतात. इक, क, ना, ईय, ता, रा, कट, इत्त, दार, बाज, पणा, री, य असे प्रत्यय लावून तयार झालेले काही प्रत्ययघटित शब्द – दैनिक, रसिक, शेतकी, माणुसकी, मानवता, शिलेदारी, कौटिल्य, घटित्त, इच्छित, नातेवाईक, दुकानदार, गोडपणा, स्वकीय, दारूबाज, दवाखाना, शौर्य, धैर्य इत्यादी सांगता येतील.

काही वेळा शब्द वा त्याच शब्दांतील काहीं अक्षरे पुन्हा-पुन्हा येतात अशा शब्दांना 'अभ्यस्त शब्द' म्हणतात. उदा : मारामार, हळूहळू, चिल्लीपिल्ली, सरसर, टकटक, काळाकाळा असे हे शब्दसिद्धी प्रकरण शुद्धलेखनासाठी अवगत असावे.

## विरामचिन्हांचा अभ्यास :

शुद्धलेखनात विरामचिन्हांना विशेष महत्त्व आहे ; पण आपण गंभीरपणे विरामचिन्हांची दखल घेत नाही आणि त्यांचा वापरही करीत नाही. मराठीत एकुण विरामचिन्हे किती असा प्रश्न विचारला तर मतभेद होतील वा त्याकडे लक्ष न पुरविल्यामुळे सांगणेही जड जाईल. पण जाणकारांची अपेक्षा राहील की योग्य तेथे 'स्वल्पविराम' वा 'अर्धविराम' च असला पाहिजे. लेखनात याकडे फारसे लक्ष दिले जात नाही असे आढळते म्हणून येथे तपशीलवारपणे नित्याच्या परिचयाच्याच का होईना पण विरामचिन्हांचा अभ्यास सादर केला आहे.

### १) पूर्णविराम (.)

अ) विधान किंवा वाक्य अर्थदृष्टया पूर्ण झाले हे दाखविण्या-साठी पूर्णविराम (.) हे चिन्ह दिले जाते.

उदा : मी सकाळी उठते.

आ) शब्दांचा संक्षेप दाखविण्यासाठी आद्याक्षरानंतर पूर्णविराम (.) हे चिन्ह दिले जाते.

उदा : ता. क. = ताजा कलम ; भा. व्यं. = भास्कर व्यंकट

### २) अर्धविराम (;)

दोन छोटी वाक्ये, 'आणि, व, पण इत्यादी' उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतांना अर्धविराम (;) हे चिन्ह दिले जाते.

उदा : अभ्यासाला उशिरा सुरुवात झाली ; पण ती पास झाली.

### ३) स्वल्पविराम ( , )

अ) एकाच जातकुळीतील किंवा समान अर्थी शब्द, प्रतिशब्द लागोपाठ आल्यास स्वल्पविराम ( , ) हे चिन्ह दिले जाते.

उदा : फुले नाजुक, सुकुमार, सुंदर, हसरी असतात.

आ) आवाहनात्मक संबोधन दाखवितांनाही हे स्वल्पविराम ( , ) चिन्ह दिले जाते.

उदा : विवेक, खेळायला जा. विदुला, अभ्यास कर.
विश्वजित, शाळेत जा.

### ४) अपूर्ण विराम ( : )

अ) वाक्याच्या शेवटी तपशील द्यावयाचा झाल्यास अपूर्ण विराम ( : ) हे चिन्ह वापरतात.

उदा : पुढील क्रमांकाच्या विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या : १०, ५०.

आ) दोन सुटचा, वेगवेगळ्या कल्पना किंवा स्वतंत्र विचार अनुबंधांसह मांडावयाचे झाल्यास अपूर्ण विराम ( : ) हे चिन्ह वापरतात.

उदा : मराठी कथा : एक दृष्टिक्षेप.

### ५) प्रश्नचिन्ह ( ? )

ज्यात प्रश्न विचारला आहे अशा वाक्याच्या शेवटी प्रश्नार्थक ( ? ) हे चिन्ह वापरतात.

उदा : तू अभ्यास केलास ?

६) उद्‌गार चिन्ह (!)

भावना व्यक्त करतांना ती दर्शविणाऱ्या शब्दांच्या शेवटी उद्‌गारवाचक (!) हे चिन्ह योजितात.

उदा : अरेरे ! तिचे वर्ष वाया गेले.

शाबास ! प्रथम पारितोषिक मिळविलेस.

७) अवतरण चिन्हे ('...') व ("...")

अ) प्रत्यक्ष बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दर्शविण्यासाठी अवतरण चिन्ह ("...") योजितात.

उदा : ती म्हणाली, "मी नक्की पास होईन".

आ) 'विशेषनाम' किंवा 'महत्त्वाचा शब्द' म्हणून उठाव देण्यासाठी अवतरण चिन्ह ('...') वापरतात.

उदा : महाभारतातील 'एकलव्य'. खांडेकरांनी 'क्रौंचवध', 'ययाति' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

मोठ्या प्रदीर्घ अवतरणासाठी साधारणपणे "..." अशी दुहेरी; व अल्पाक्षर छोट्या रचनांसाठी एकेरी '...' अवतरण देण्याची प्रथा आढळते. मात्र याबाबत नक्की नियम आढळत नाही. मुळात दुहेरी अवतरणाचीच प्रथा आहे. एकेरी अवतरण साधारणपणे एकेका शब्दास्तव योजिले जाते.

८) संयोग चिन्ह (–)

अ) दोन शब्द जोडतांना संयोग–चिन्ह (–) वापरतात.

उदा : प्रेम–विवाह, ग्राहक–भांडार.

आ) एका ओळीत वाक्य लिहितांना शेवटी शब्द अपूर्ण राहिल्यास संयोग (-) हे चिन्ह वापरतात. उदा : विद्या-पीठ परीक्षांसाठी केंद्रावर चौकशी करावी.

९) अपसारण (—)

अ) बोलतांना विचारमालिका तुटल्यास अपसारण (—) हे चिन्ह वापरतात.

उदा : नाटकातील संवाद : मी सर्व प्रयत्न केले, पण—

आ) काही स्पष्टीकरण द्यावयाचे असल्यासही हे अपसारण चिन्ह 'स्पष्टीकरण चिन्ह' म्हणूनही योजितात.

उदा : ती विद्यार्थिनी- जिने प्रथम पारितोषिक मिळविले, ती आपल्या महाविद्यालयात शिकत आहे.

१०) कंस ( )

एखाद्या गोष्टीचे स्पष्टीकरण किंवा खुलासा देण्यासाठी कंस गोलाकार (...) किंवा चौकोनी [...] हे चिन्ह योजितात.

उदा : बाजीप्रभूने (शिवाजी महाराजांचा साथीदार) विलक्षण पराक्रम गाजविला.

११) विग्रह चिन्ह (-)

दोन शब्दातील किंवा वस्तूतील वेगळेपण दाखविण्यासाठी विग्रह (-) हे चिन्ह वापरतात.

उदा : अर्जुन धनुष्य-बाण घेऊन सज्ज झाला.

### १२) दंड चिन्ह ( । )

काव्यात पूर्णविरामाच्या ऐवजी दंड ( । ) हे चिन्ह वापरतात.
उदा : महाराष्ट्र धर्म वाढवावा ।

### १३) अवग्रह ( ऽ )

एखाद्या स्वराचे उच्चारणातील दीर्घत्व दर्शविण्यासाठी अवग्रह ( ऽ ) हे चिन्ह वापरतात.
उदा : आऽई, अगाऽई, ओऽऽ, इत्यादी.

### १४) टिंब टिंब (……)

वाक्यात गाळलेली जागा दर्शविण्यासाठी टिंब टिंब (……) या चिन्हांचा उपयोग करतात.
उदा : लालबहादूर शास्त्री भारताचे……होते.

जुन्या मराठी भाषेत फारशी विरामचिन्हे योजिली जात नसत; पण इंग्रजी वाङमयाच्या संपर्कामुळे विरामचिन्हांच्या वापराला विशेष महत्त्व आले आहे. काव्यात तर या विरामचिन्हांना अर्थाच्या दृष्टीने अपरंपार महत्त्व कवींनी दिलेले आहे. तेव्हा आता मराठी शुद्धलेखनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून विराम–चिन्हांचा अभ्यास व्हायला हवा. त्यांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करता कामा नये.

## समारोप :

शेवटी 'गाता गळा व लिहिंता हातवळा' हेच लक्षात ठेवले म्हणजे भाषा शुद्ध व चांगली लिहिणे ही सहज साध्य होणारी

गोष्ट आहे. यासाठी लेखनाचा, वाचनाचा खरा सराव वाढविला पाहिजे. शासनमान्य मराठी शुद्धलेखन महामंडळाच्या नियमांनुसार मुद्रित पुस्तकातील ऱ्हस्व-दीर्घ, अनुस्वार, विराम इत्यादींचे अनुकरण करून वाचन, लेखन केल्यास शुद्धलेखनाची वेगळी तयारी करावी लागत नाही. शिवाय किरकोळ सुद्धा का असेना, पण शंका आली की लागलीच शब्दकोशांतून वा जाणकारांकडून शंका निरसन करून घेण्याची सवय लावल्यास सततच्या निदिध्यासाने शुद्धलेखन कला साध्य होईल.

मराठी शुद्धलेखनावर प्रसंगोपात्त व अनेक प्रकारे लेखन झालेले आहे. या लेखनामागे लेखनशुद्धीची व लेखनाच्या विकासाचीच भूमिका आहे.

मराठी साहित्य महामंडळाने पुरस्कृत केलेली अधिकृत शुद्धलेखनाची नियमावली हा या अभ्यासाचा पाया आहे. शुद्धलेखनविषयक वादविवादाचा, मते आणि मतभेदांचा येथे विचार करण्याची सुतराम आवश्यकता नाही. मराठी शुद्धलेखनाचा विचार अंतर्भूत असलेल्या पुस्तकांची काही नावे शेवटी ' अभ्यासाच्या सामग्री ' त दिलेली आहेतच.

❊ ❊ ❊

## मराठी शुद्धलेखन स्वाध्याय :

१) नमुन्यासाठी पुढे काही निवडक अशुद्ध शब्दांचे शुद्ध शब्द करून दाखविले आहेत.

| अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|
| माध्यान्ह | माध्याहन् |
| अपन्हुती | अपहुन्ती |
| प्रल्हाद | प्रहल्ाद |
| उज्वल | उज्ज्वल |
| तज्ञ | तज्ज्ञ |
| तत्व | तत्त्व |
| सत्व | सत्त्व |
| ब्रम्ह | ब्रह्म |
| निस्पृह | निःस्पृह |
| दैदीप्यमान | देदीप्यमान |
| निर्भत्सना | निर्भर्त्सना |
| विनंति | विनंती |
| महत्वाकांक्षा | महत्त्वाकांक्षा |
| मित्रत्त्व | मित्रत्व |
| प्रज्वलीत | प्रज्वलित |
| आशिर्वाद | आशीर्वाद |
| शताब्दि | शताब्दी |

| अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
| --- | --- |
| ज्योतिषाचा (ज्योतिष) | ज्योतिष्याचा |
| पक्षाचा (पक्षी) | पक्ष्याचा |
| उर्ध्वदेहिक | और्ध्वदेहिक |
| उपरनिर्दिष्ट | उपरिनिर्दिष्ट |
| दृक्गोचर | दृग्गोचर |
| औद्योगिकरण | उद्योगिकरण |
| वैय्याकरण | वैय्याकरणी |
| परिषद् | परिषद |
| अच्छादन | आच्छादन |
| भगवद्गिता | भगवद्गीता |
| षष्ठयाब्दी | षष्ठ्यब्दी |
| स्वःता | स्वतः |
| शारिरिक | शारीरिक |
| साहाजिक | साहजिक |
| उत्छंखल | उच्छृंखल |
| अनूस्युत | अनुस्यूत |
| वास्तूशांती | वास्तुशांती |
| पम्दपत्र | पद्मपत्र |
| सत्शिष्य | सच्छिष्य |
| पुरःस्कृत | पुरस्कृत |
| कवीसंमेलन | कविसंमेलन |
| भूमीपूजन | भूमिपूजन |

२) पुढे काही अशुद्ध उतारे देऊन ते मराठी शुद्धलेखन महामंडळाच्या नियमांप्रमाणे शुद्ध स्वरूपात लिहून दाखविले आहेत.

अ) अशुद्ध उतारा : १

वारकरि पथ हा महाराष्ट्रातिल एक अत्यत लोकप्रीय पथ आजहि आहे. आणी पुर्वीही होता. अपार भक्ति आणि उत्कटप्रिति या पंथात आपल्या साध्या, सरळ तत्वज्ञान आणी आचाराने सांगीतलेली आहे. विठलाची भक्ति, नाम भजनाचे महात्म्य भुतमात्रातच भगवंताचे अधीष्ठान मानून त्यांच्यावरिल प्रेम 'नाचू किर्तनाचे रंगी, ज्ञानदिप लावू जगी. हि प्रतीज्ञा लौकीक प्रतीष्ठा जातीभेद विसरून अध्यात्मिक पातळीवरील लोकशाहि एकात्मता हि या वारकरी पंथाचा खास वैशीष्टये आहे.

अ) शुद्ध उतारा : १

वारकरी पंथ हा महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय पंथ आजही आहे, आणि पूर्वीही होता. अपार भक्ती आणि उत्कट प्रीती या पंथात आपल्या साध्या सरळ तत्त्वज्ञान आणि आचाराने सांगितलेली आहे. विठ्ठलाबद्दलची भक्ती, नामभजनाचे माहात्म्य भूतमात्रातच भगवंताचे अधिष्ठान मानून त्यांच्यावरील प्रेम 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।' ही प्रतिज्ञा, लौकिक-प्रतिष्ठा, जातिभेद विसरून आध्यात्मिक पातळीवरील लोकशाही एकात्मता ही या वारकरी पंथाची खास वैशिष्ट्ये आहेत.

आ) अशुद्ध उतारा : २

यादवापूर्विच्या साम्राजात कनार्टक माहाराष्ट्र या दोन प्रातांच्या सिमारेषा अगदिच अस्पष्ट होत्या. त्यामध्ये सलोख्याचे नाते होते असे आढळते. परस्पराना हे प्रांत अपरीचीत नव्हते. यादवकाळात मात्र महाराष्ट्र आणी मराठि भाषा संस्कृति अस्मीता नव्याने रुप धारण करताना दिसते. म्हणूनच महाराष्ट्राच्या सांस्कृतीक ईतीहासात यादवकाळाला महत्वपूर्ण स्थान आहे !

आ) शुद्ध उतारा : २

यादवांपूर्वीच्या साम्राज्यात कर्नाटक–महाराष्ट्र या दोन प्रांतांच्या सीमारेषा अगदीच अस्पष्ट होत्या. त्यामध्ये सलोख्याचे नाते होते असे आढळते. परस्परांना हे प्रांत अपरिचित नव्हते. यादवकालात मात्र महाराष्ट्र आणि मराठी भाषा, संस्कृती, अस्मिता नव्याने रूप धारण करतांना दिसते. म्हणूनच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात यादवकालाला महत्त्वपूर्ण स्थान आहे.

३) पुढे काही अशुद्ध वाक्ये शुद्धलेखनाच्या नियमानुसार लिहून दाखविली आहेत.

क) लिहीताना अनवधानाने एकादी चुक होणे वेगळे व पांच दहा चुका होणे वेगळे.

क) लिहितांना अनवधानाने एखादी चूक होणे वेगळे, व पाच दहा चूका होणे वेगळे.

ख) सर्व विद्यार्थ्यांनी उद्यां उपस्थित रहावे; महत्त्वाच्या सूचना द्यावयाच्या आहेत.

ख) सर्व विद्यार्थ्यांनी उद्या उपस्थित राहावे. महत्त्वाच्या सूचना द्यावयाच्या आहेत.

ग) हे असं बोलणं त्याने ऐकून घेतलं नसते.

ग) हे असे बोलणे त्याने ऐकून घेतले नसते.

घ) कर्मणूक, नितीमत्ता, क्रांतीवीर, कारागृह हे मराठीतील काही शब्द होत.

घ) करमणूक, नीतीमत्ता, क्रांतिवीर, कारागृह हे मराठीतील काही शब्द होत.

ङ) चिपळुणकरानी निबंधमाला सुरु केली.

ङ) चिपळुणकरांनी 'निबंधमाला' सुरू केली.

च) अकस्मात् तिथं पूर्ववत् स्थीती निर्माण झाली.

च) अकस्मात तिथे पूर्ववत स्थिती निर्माण झाली.

छ) त्याचे मूळ गांव कोणचे ?

छ) 'त्याचं मूळ गाव कोणते ?'

ज) वैजापूर. म्हणून तर वैजांपूरलाच हळुहळु त्याने जमिन–जुमला घेतला.

ज) "वैजापूर ! म्हणून तर वैजापूरलाच हळूहळू त्याने जमीन-जुमला घेतला."

४) विरामचिन्हे योग्य त्या ठिकाणी देऊन पुढील वाक्ये दिली आहेत.

क) आम्ही रोज महाविद्यालयात; जातो.

क) आम्ही रोज महाविद्यालयात जातो.

ख) मी काल तुमच्याकडे आले; होते पण भेट होऊ शकली नाही.

ख) " मी काल तुमच्याकडे आले होते; पण भेट होऊ शकली नाही. "

ग) ज्ञानेश्वर–एकनाथ–तुकाराम रामदास इ. अनेक संत महा– राष्ट्रात होऊन गेले.

ग) ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास इ. अनेक संत महाराष्ट्रात होऊन गेले.

घ) सरिता नीट अभ्यास कर.

घ) " सरिता, नीट अभ्यास कर. "

च) राजनारायण यांचे उपोषण सुटणार.

च) राजनारायण यांचे उपोषण सुटणार ?

छ) अहाहा ? किती सुंदर दृश्य हे ?

छ) " अहाहा ! किती सुंदर दृश्य हे ! "

ज) हाय रे दैवा, काय घात हा ?

ज) " हाय रे दैवा !! काय घात हा !!! "

झ) ' तू येशील, मी त्याला विचारले. '

झ) ' तू येशील ?' मी त्याला विचारले.

★ ★ ★

# वृत्तलेखन

वृत्तलेखन हा एक नित्याचा परिचित आणि अत्यंत उपयुक्त विषय आहे. आपल्या दररोजच्या जीवनात, व्यवहारात कितीतरी पाहिलेले – अनुभवलेले सारेच आपल्याला सांगावे लागते. त्यात कथात्मकता, निवेदनशैली अवतरलेली आढळते. सभा, संमेलने, विविध कार्यक्रमांचे इतिवृत्त आणि वृत्तांत लिहिण्याची जबाबदारीही अनेकदा आपणास पेलावी लागते. वार्ताहर, बातमीदार, संपादक होण्यासाठीही वृत्तांतलेखन–संकलन-सराव असणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊनच येथे वृत्तांत–लेखनाचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. वृत्तांत–लेखन हे शास्त्र असण्यापेक्षा ती एक कलाही आहे असे म्हणता येईल.

तात्पर्य लेखक, नेता, संपादक, उपसंपादक, वार्ताहर या सगळ्यांनाच वृत्तांत-लेखनाची कला अवगत असणे आवश्यक ठरते. नेत्यांचाही येथे समावेश करण्याचे कारण त्यानाही प्रतिनिधी म्हणून अनेक ठिकाणी प्रतिनिधित्व करावे लागते. त्यांना तेथेही व परतल्यानंतरही झालेल्या कार्याचे, सभांचे तपशीलवार वृत्तांत सादर करावेच लागतात. या वृत्तांत-कथनातूनच नेत्याचे सारे गुणावगुण प्रकर्षाने लक्षात येतात, विशेष कौशल्य दिसते. विविध संस्थांचे चिटणीस, कार्यवाह यांनाही वृत्तांत-कथनाच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. यावरून समाजात वक्तृत्व–कलेप्रमाणेच वृत्तांत-लेखन कलेचीही महती जाणवते आहे. म्हणून येथे काहीशी विस्ताराने वृत्तांत-लेखनकलेची मीमांसा केली आहे.

## "वृत्तांत" म्हणजे काय ?

"वृत्त" म्हणजे वार्ता किंवा बातमी आणि वृत्तांत म्हणजे घडलेली हकीगत. एखादी घटना, प्रसंग, त्यात असलेली व्यक्तीची गुंतवणूक किंवा एखाद्या व्यक्तीच्या संदर्भातील, त्यांच्याशी संलग्न अशी घटना किंवा प्रसंग, यथार्थपणे नेटक्या शब्दात काही महत्त्वाच्या गोष्टींच्या, उदा. : स्थळ, काळ, कृती इत्यादींच्या तपशीलासह कथन करणे याला वृत्तांत म्हणतात. वृत्तांतात स्वत:च्या वैयक्तिक भाष्याला फारसा वाव नसतो. नि:संदिग्ध भाषेत, सरळ घडलेल्या गोष्टींचे घटना, प्रसंग, व्यक्तींच्या संदर्भातील काही क्षणांचे, त्यात निवेदन असते.

वृत्तांत म्हणजे वार्ताविहार, नवी माहिती, ताज्या घटनांचा वृत्तांत, आकर्षक माहिती. ज्याचे वृत्त देता येईल अशा नव्या घटना, किंबहुना कोणतीही प्रसंगोपात्त घटना, वृत्तांत हा वाचकांना नेहमीच आकर्षक आणि वैशिष्टय़पूर्ण वाटला पाहिजे. वृत्तांताचा महत्त्वाचा गुणविशेष म्हणजे तो जास्तीत जास्त लोकांना, वाचकांना आकर्षक वाटला पाहिजे.

जॉन बोगार्ट याने वृत्त वैशिष्टय़ाचे उदाहरण देतांना म्हटले आहे की. " 'कुत्रं माणसाला चावलं' ती वार्ता होत नाही, कारण ही नेहमी घडणारी घटना असते, पण 'माणूस कुत्र्याला चावला' तर ती वार्ता होते." म्हणजे वृत्त हे साधारणपणे कुतूहलजनक, खळबळ-जनक, रोचक, वेधक असावे. वृत्तांताची दोन शब्दात व्याख्या करावयाची झाल्यास "चांगला मजकूर" अशी करता येईल. "वृत्तसाधना" या व्याख्यान-ग्रंथात श्री. द्वा. भ. कर्णिकांनी नमूद केल्याप्रमाणे पत्रकार आपल्या स्वत:शी ते प्रश्न करीत असतात.

त्या प्रश्नांची आद्य अक्षरे म्हणजे 'फाइव्ह डब्ल्यूज' व एक 'एच्' अशी आहेत. त्यात वृत्तांत-लेखनाचे सारे मर्म येते. हे प्रश्न म्हणजे who, what, when, where, why & how हे होत.

मराठीत या प्रश्नांचे भाषांतर सहा "क" मध्ये करता येईल. कोणी, काय, केव्हा, कोठे, का आणि कसे या सहा 'क' कारांना उत्तरे दिल्यानंतर वृत्तांत म्हणजे काय हे पूर्णपणे स्पष्ट झाल्याशिवाय राहत नाही. या उत्तरात वृत्तांत तयार होतो. या गोष्टी वृत्तांत-लेखनात अपरिहार्यपणे याव्यात.

## वृत्तांत - लेखनाची पूर्वतयारी

वृत्तांत-लेखनासाठी वृत्तांत-लेखकाजवळ पुढील गोष्टींची आवश्यकता आहे.

१) लेखन – चिंतनातील गती
२) भाषाप्रभुत्व, लेखनशैली
३) कल्पकता आणि स्मरणशक्ती
४) विचारातील सुस्पष्टता
५) अल्पाक्षर-रमणीयत्व
६) व्यासंग, अद्यावत वाचन, बहुश्रुतता.
७) प्रसंगावधान, समयोचितता,
८) साद-पडसाद, क्रिया-प्रतिक्रियांची जाणीव.
९) वाचकांना चटका लावण्याचे सामर्थ्य
१०) चिकित्सक व जिज्ञासू वृत्ती
११) वाचकांशी विश्वासार्ह मैत्री
१२) सुंदर हस्ताक्षर

साधारणपणे वृत्तांत–लेखकांकडून यशस्वी वृत्तांत-लेखन होण्यासाठी उपरोक्त गुणांची आपण अपेक्षा ठेवायला हरकत नाही.

यावरून वृत्तांत-लेखक हा अभ्यासू वृत्तीचा हवा. त्याने विशिष्ट प्रकारे प्रशिक्षण घेऊन वा लेखनाचा सराव करुन वृत्तांत–लेखन कला संपादन केली पाहिजे. सूक्ष्म वास्तवदर्शी दृष्टिकोन आणि मनोवृत्ती त्याने जोपासली पाहिजे. वृत्तांताशी संलग्न अशा समान स्मृतींची नोंद, योग्य ठिकाणी, त्याला वृत्तांतात घेता आली पाहिजे. आपल्या बुद्धिचातुर्याचा विनियोग वृत्तांत–लेखकाने वृत्तांत-लेखनात केला पाहिजे. सभा, संमेलने, परिषदा, कायदे-मंडळांची अधिवेशने, क्रीडा, रंगभूमी, सिनेमा, कला इ. अनेकविध क्षेत्रांतील वृत्तांत वेळोवेळी टिपावे लागतात. यासाठी या अनेक क्षेत्रांतील मर्मज्ञ असा वृत्तांत-लेखक हवा. वृत्तांत कोणत्या शैक्षणिक पातळीच्या व दर्जाच्या वाचकांसाठी आहे, याचे भान लिहितांना त्याने ठेवणे आवश्यक आहे. शिवाय हे सारे लेखन त्याने समतोल बुद्धीने केले पाहिजे.

वृत्तांत सुव्यवस्थितपणे लिहिता येणे हे सुद्धा एक शास्त्र आहे असेही म्हणता येईल. वृत्तांत–लेखकाने अत्यंत काळजीपूर्वक बोलणाऱ्यांच्या वक्तव्याकडे लक्ष पुरविले पाहिजे. त्यासाठी त्याला लेखनाचा सराव असला पाहिजे. शिवाय ‘स्टेनो’ प्रमाणे स्वतःला उलगडणारी अशी एक सांकेतिक लघुलिपी जलद-गतीने लिहिण्यासाठी त्याला अवगत असली पाहिजे. समजून-उमजून जलद गतीने वृत्तांताची कच्ची नोंद घेता आली पाहिजे. मग स्वस्थपणे वृत्तांताचे अंतीम लेखन करता येईल. वृत्तांत-लेखकाने यासाठी जागरूक राहून व्यवस्थित वृत्तांत घेतला पाहिजे. समजा, बोलणारा एखाद्या वेळी नाकबूल करणारा असला तरी ‘तुम्हाला बोलतांना भान नव्हते,

पण तुम्ही असेच बोललात' हे आत्मविश्वासपूर्वक ठणकावून सांगता आले पाहिजे. अशा वेळी निःपक्षपाती व सत्यप्रिय श्रोते जरूर वृत्तांत–लेखकाच्याच बाजूने कौल देतील.

वृत्तांत–लेखकाने सत्य परिस्थितीचे निवेदन केले पाहिजे. बोलणाऱ्याच्या बोलण्याला किंवा कोणत्याही मूळातील आशयाला विकृत वळण लागणार नाही, याची त्याने खबरदारी घ्यावी. कोणताही महत्त्वाचा मुद्दा वगळला जाता कामा नये. शिवाय लेखकाने आपले वैयक्तिक विचार वा मत त्यात मिसळण्याचा प्रयत्न करू नये. अन्यथा वृत्तांत-लेखकाने आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीचा तो निश्चितच दुरुपयोग होईल.

वृत्तांत-लेखकाने नेहमी वस्तुस्थिती कथन केली पाहिजे. वाचकांची या लेखनाने दिशाभूल होता कामा नये. समजा एखाद्या सभेला उपस्थित राहणाऱ्या व्यक्तींची संख्या सांगावयाची असेल तर तेथे वस्तुस्थिती सांगणे विश्वासार्ह होईल. अकारण संख्येचे आकडे कमी जास्त सांगून वाचकांचा विश्वास गमावल्यासारखे होऊ शकेल. काही वेळा उपस्थित मान्यवरांची नावे देतांना आपल्या मित्रांची नावे देऊ नयेत. आपल्या स्नेहसंबंधातील वा परिचितांतील प्रतिष्ठितांची नावे देणे अनुचित ठरेल. उलट आपले विरोधक असूनही ते प्रतिष्ठित असल्यास त्यांचीही नावे मान्यवर उपस्थितांत आवर्जून आलीच पाहिजेत. वृत्तांतात सत्याचा अपलाप करण्याचे प्रयोजन नसते. सभेच्या वृत्तांतात वक्त्यांच्या बोलण्यातील मुख्य आशय येईल. अशा सभेत गोंधळ-गडबड झाल्यास तिचाही वास्तवस्पर्शी परामर्श निःपक्षपातीपणाने रेखाटला पाहिजे.

वृत्तांत–लेखनाच्या सरावासाठी वर्तमानपत्रातून नियमित प्रसिद्ध होणारे वृत्तांत बारकाईने वाचण्याची सवय ठेवली पाहिजे. वृत्तांतात नाविन्य ओतता आले पाहिजे. इंग्रजीतील 'न्यूज' शब्दाचा अर्थ "नवीन" असाच आहे. नवीन मूर्त स्वरुपात यावयाच्या संशोधनाविषयीचा वृत्तांत हा काल्पनिक वृत्तात मोडतो, तर वाचकांना स्वारस्य नसलेली अशी एखादी महत्त्वाची घटना (उदा. : नव्या अभ्यासक्रमाचा वृत्तांत) ही सुद्धा वृत्तांतातच मोडते. सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक इ. क्षेत्रांतील नव्या जुन्या प्रवृत्ती यांचा समावेश वृत्तांत–लेखनात करता येतो. उदाहरणादाखल पाहणीचे वृत्तांत यात समाविष्ट करता येतील.

वृत्तांत रोचक आणि आकर्षक होण्यासाठी त्यात धक्का–दायक व अनपेक्षित असे काहीतरी असावे लागते. उदा. : 'पंचवटी एक्सप्रेस सुखरूप पोहोचली', "भक्ताने देवाला नमस्कार केला". हे वृत्तांत सपक, आळणी वाटतील. पण 'पंचवटी एक्सप्रेसला पोहोचण्यास विलंब झाला', किंवा 'भक्ताने देवाचे दर्शन नाकारले', हे वृत्त अनपेक्षित, धक्कादायक म्हणूनच लक्ष्यवेधी ठरते. तसे पाहिले तर कोणत्याही वाचकाला सर्वात मोठी वाटणारी बातमी म्हणजे स्वतःबद्दलची असते. 'सिडल' या अमेरिकन संपादकाने आपल्या कचेरीत सर्व प्रमुख जागी एका वाक्याचा फलक लावला होता 'There is one subject and one subject only that interests everyone everywhere all the time, that subject is ME.' प्रत्येक वाचकाला सिडलच्या म्हणण्यानुसार सर्वत्र सर्वकाळ अत्यंत आवडीचा विषय म्हणजे 'मी', 'स्वतः' हा होय. उदा. : मान्यवर व्यक्तींच्या भाषणाच्या वृत्तांतात मान्यवराच्या उपस्थितीत कोणाकोणाची नावे

आलेली आहेत, यावरच आपले लक्ष केंद्रित झालेले असते. आपण प्रथम त्यात आपले नाव आलेले आहे किंवा नाही हे पाहतो. फोटोतसुद्धा आपण पूर्ण, अर्धवट का होईना पण कुठे आहोत, हे पाहण्यासाठी धडपडतो. पण यापेक्षा सतत वाचणाऱ्याचे भान वेधून त्याला वृत्तांतात आवाहन केलेले असले पाहिजे. वाचकाला स्वतःविषयीच्या, स्वतःचे हितसंबंध ज्यात गुंतलेले आहेत अशा किंवा स्वतःला परिचित असलेल्या गोष्टींविषयींच्या वृत्तांतात विशेष रस असतो. अर्थातच या वृत्तांतास वैयक्तिक व मर्यादित वाचकवर्ग असतो. वृत्तांताला वाचनीयता येण्यासाठी वेळ, अधिकार, महत्त्व आणि स्वारस्य इत्यादी गोष्टी त्यात असल्या पाहिजेत. यातूनच वृत्तांताला महत्त्व प्राप्त होते.

## वृत्तांत - लेखनाचा मार्ग

वृत्तांत–लेखनात पुढील गोष्टींचा समावेश करता येईल.

१) वैयक्तिक अनुभवांचे कथन

उदा. : पत्रमाध्यमातून एका मित्राने आपल्या दुसऱ्या मित्राला लिहिलेले पत्र – ज्यात दिवाळी सुटीत विविध प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या, भरपूर प्रवास केला या वृत्तांताचा समावेश करता येईल. शिवाय यात आपल्या मित्राने सुटीत केलेली मजा पुन्हा इतरांना आपण सांगतो, तेही वृत्तांत–कथनच होईल.

२) विविध प्रसंगी मान्यवरांनी केलेल्या भाषणांचे वृत्तांत.

उदा. : महाविद्यालय सुरू होतांना प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून केलेले अभिभाषण, स्नेहसंमेलनप्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी गाजविलेले भाषण, वक्तृत्वस्पर्धेच्या पारितोषिक – वितरण

समारंभात झालेले पाहुण्यांचे भाषण, हिंदी वा संस्कृत–दिनाच्या निमित्ताने केलेले भाषण, सत्कार–समारंभातील भाषण इ. भाषणाचे वृत्तांत या लेखनात येतात.

३) सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर नेत्यांचे कार्यक्रम वृत्तांत –

उदा. : मुख्यमंत्र्यांचे स्वातंत्र्यदिनी राज्याला उद्देशून भाषण किंवा राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल यांचे प्रजासत्ताक–दिनी राष्ट्र, राज्य वा विशिष्ट सभेला उद्देशून केलेल्या भाषणांचे वृत्तांत यात मोडतील. एखाद्या पक्षाच्या अध्यक्षांनी व राष्ट्रीय नेत्यांनी जनतेला वा आपल्या कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या भाषणांचे वृत्तांतही यात समाविष्ट होतील. हे वृत्तांत–लेखन करतांना राजकीय, सामाजिक संदर्भातील जाण व ज्ञान त्या वृत्तांत– लेखकाला असणे आवश्यक आहे. अन्यथा या भाषणांचे वृत्तांत त्याला निर्दोष लिहिता येणार नाहीत. या क्षेत्रातील वक्त्यांच्या प्रतिपादनातील आशय त्याला कळणे अत्यावश्यक आहे.

४) नियोजित विषयावर झालेल्या वाद-सभांतील चर्चेचा वृत्तांत–

विविध वादविवाद सभांच्यावतीने आंतरमहाविद्यालयीन वा सर्वांसाठी खुल्या वादविवाद स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यात दिलेल्या विषयांवर जो वादविवाद घडतो, त्याच्या वृत्तांताचे लेखन वृत्तांत-लेखन सामर्थ्य अंगी असल्याशिवाय करता येणे अवघड आहे. त्यात सहभागी होणाऱ्या स्पर्धक वक्त्यांचा महत्त्वाचा मुद्दा तर सुटू नये आणि शिवाय संक्षेपाने सर्वांच्या प्रतिपादनाचे सार त्या वृत्तांतात गोवता आले पाहिजे. ती खरी वृत्तांत-लेखनाची कसोटी. उदा. : ‘ चित्रपटाने नाट्यसृष्टीची हानी केली आहे ’, ‘मालमत्तेच्या समान वाटपाशिवाय खरी लोकशाही अस्तित्वात येणार नाही. ’, असे हे विधानात्मक विषय असतात. त्याला दोन

उलट–सुलट, अनुकूल–प्रतिकूल बाजू असतात. दोन्ही बाजूंनी वादपटू बोलतात आणि शेवटी अध्यक्षीय समारोप होतो. तेव्हा सहभागी झालेल्या १०–१२ वक्त्यांच्या आशयातील मुख्य सूत्र पकडणे अवघड कसोटी आहे. सरावाने ती जमते.

५) वृत्तपत्रांमध्ये वाचकांचे मनोगत, गाऱ्हाणे, तक्रारी, सूचना, उलट-सुलट चर्चा, प्रतिक्रिया छापण्याची सोय असते. 'बहुतांची अंतरे', 'लोकमानस', 'वाचकांचे मनोगत'. 'वाचकांच्या प्रतिक्रिया' 'माझेही मत', 'स.न.वि.वि.' अशा अनेक शीर्षकांखाली ही सदरे कमालीची लोकप्रिय झाली आहेत. त्यात पुष्कळदा मान्यवर लेखकांची पत्रेही प्रसिद्ध होत असतात. त्यामध्ये उदाहरणादाखल पुढील नामवंतांची नावे आढळतात. प्रभाकर पाध्ये, अ. भि. शहा, दुर्गा भागवत, अ. वा. वर्टी, रणजित बुधकर इत्यादी. शासन, संप, शिक्षण, कृषी, विज्ञान, राजनीती, कला, भाषा इ. संदर्भातील विविध प्रश्नांवर विविध तऱ्हांनी जाहीरपणे उपरोक्त सदरांतून चर्चा घडून येतात. अशा चर्चांचे वृत्तांत–संकलन करणे आणि त्यातील एकूण सूत्र, सांगोपांग चर्चा, संक्षेपाने ग्रथित करणे हाही वृत्तांत–लेखनाचाच भाग आहे.

६) घटना – प्रसंग – अपघात वृत्तांत

उदाहरणार्थ, रिक्षा आणि बस यांची जोरदार टक्कर झाली असताना वार्ताहराला त्या घटनेचे वृत्तांत–लेखन तत्परतेने करून द्यावे लागते. या लेखनाला संपादकाच्या दृष्टीने फार महत्त्व असते. वार्ताहराकडून तातडीने सर्व धागेदोरे फोटोंसह, कायदा सांभाळून, वृत्तांत – लेखन त्याला हवे असते. घडलेल्या घटनेच्या बाबतीत विभिन्न मते आणि दृष्टिकोन असू शकतात.

मतांतरही असू शकते. पोलिसी खात्यातील वृत्तांत, मुलाखती निर्जीव, रुक्ष व तांत्रिक खटपटींनी भरलेले असतात. कुशाग्र वृत्तांत–लेखक हे सगळे टाळून वस्तुस्थिती, स्थळ काळाचे भान राखून वाचकांची उत्कंठा व समाधान जागृत करून वृत्तांत लिहितो. यासाठी नेटकेपणाने तपशील टिपण्याचे कौशल्य लाभते. पुनरुक्ती टाळून महत्त्वाच्या बाजूचा विधानाचा या प्रकारच्या वृत्तांत–लेखनात विचार करावा लागतो.

७) विविध मंडळांचे वार्षिक इतिवृत्त

आपल्याकडे सार्वजनिक वाचनालये, नाट्य–संस्था, सांस्कृतिक कला-क्रीडा मंडळे यांचे वर्धापन दिन वा महत्त्वाचे कार्यक्रम साजरे होतात. तसेच व्यापारी-सहकारी बँका, महा–विद्यालयातील ग्रंथालये, अन्य विविध विभाग यांच्या वर्षभरातील कार्याचे इतिवृत्त, वार्षिक अहवाल सादर करावे लागतात. साधारणपणे प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभेत हे वृत्तांत छापील स्वरूपात सादर करतात. हे वार्षिक वृत्तांत – लेखनच असते. त्यासाठी संपूर्ण वर्षभराची दैनंदिनी डोळ्यांसमोर ठेवून त्यातील ठळक गोष्टींची नोंद, निवडक घटना प्रसंगविशेषासह सांगाव्या लागतात. वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांच्या वेळा, दिनांक, वक्त्याचे उद्‌गार, प्रमुख व अन्य उपस्थित यांची कच्ची नोंद यासाठी ठेवावी लागते. त्यातूनच वर्षाच्या अखेरीस सादर करावयाचा वृत्तांत तयार होतो. तो रटाळ, कंटाळवाणा होणार नाही याची खबरदारी घ्यावी लागते.

८) मानपत्रांचे लेखन

'मानपत्र' म्हणजे कर्तबगार व्यक्तीच्या जीवनाचा आलेख, समग्र वृत्तांतच असतो. एखाद्या महनीय व्यक्तीची विशिष्टपदी

निवड झाल्यावर तिने एखादा महत्त्वाचा यशाचा टप्पा गाठल्यावर त्या व्यक्तीला जाहीरपणे मानपत्र देण्याची प्रथा आहे. पुष्कळदा वयाची साठी, पंच्याहत्तरी, क्वचित शंभरी ओलांडल्याच्या आनंदाप्रित्यर्थ हे षष्ठब्दि–अमृत–शतक महोत्सव साजरे होतात. अशा वेळी दिले जाणारे मानपत्र म्हणजे, त्या सन्मानित होणाऱ्या व्यक्तीचे विविध क्षेत्रातील लक्षणीय कार्य, त्याचा चरित्रात्मक वृत्तांत – लेखनच होय. या मानपत्रात त्या व्यक्तीचा वारसा, त्याच्या घराण्याचा पूर्वेतिहास, जन्म, बालपण, शिक्षण, परिस्थिती, संस्कार, सार्वजनिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रातील कार्य, भूषविलेली विविध पदे, गाजविलेली मर्दुमकी, जीवनातील संदेश, व्यक्तीचे महत्त्वाचे विचारधन इत्यादींचा समावेश होतो.

९) सभा–परिषदांचा वृत्तांत

सभेचा किंवा परिषदेचा वृत्तांत देताना काही गोष्टी विशेष महत्त्वाच्या म्हणून श्री. ज. पां. देशमुखांनी आपल्या 'पत्रकार' या पुस्तकात यथार्थपणे सांगितल्या आहेत.

अ) सभा अगर परिषद कोठे चालू होती – त्या स्थळाचे वर्णन, ठिकाण, नेमके कोणत्या ठिकाणी आहे त्याचे वर्णन, सुशोभित मंडपातील अगर सभागृहातील वातावरण कसे होते, व्यासपीठावर कोण बसले होते, सभेची वेळ कोणती होती, प्रत्यक्षात सभा केव्हा सुरू झाली, उशीर झाल्यास का आणि कोणामुळे झाला, वक्त्याने विलंब लावल्यास प्रारंभी क्षमा मागितली काय, एवढ्या गोष्टी द्याव्यात.

ब) एखाद्या सभेला अमर्याद गर्दी असल्यास तेथे आयत्या वेळी झालेल्या गोंधळाबाबतचा तपशील उपस्थित लोकांच्या उद्‌गारात वा शब्दांत द्यावा.

क) वक्त्याच्या बोलण्यात एखादा विवाद्य मुद्दा आल्यास त्या संदर्भातील श्रोत्यांच्या प्रतिक्रिया वृत्तांताच्या अखेरीस न विसरता द्याव्यात. मात्र एखादा मुद्दा आपल्याला नीट स्पष्ट न झाल्यास व्याख्यानानंतर वक्त्यास भेटून स्पष्ट करून घ्यायला हरकत नाही. एखादा मुद्दा जरी आपल्याला पटला नाही तरी तो वक्त्याचे मत म्हणून नमूद करणे वृत्तांत-लेखकाचे कर्तव्य आहे.

ड) वृत्तांत-लेखकाने लेखनमर्यादा आणि लेखनसीमा यांचे भान ठेवावे. यावरून सभा-परिषदांचे वृत्तांत लिहिणे ही एक मोठी कठीण गोष्ट असून ती जबाबदारी वृत्तांत-लेखकाला पार पाडावीच लागते.

## वृत्तांत - लेखन : अपेक्षा

वृत्तांत-लेखनात साधारणपणे पुढील गोष्टी अपेक्षित आहेत. त्यातूनच वृत्तांत-लेखकाला मार्गदर्शन होईल.

१) एखाद्या कार्यक्रमाचा वृत्तांत सांगतांना त्यात कार्यक्रम सुरू झाल्याची वेळ, स्थळ, गाव, तालुका, जिल्हा, राज्य यांची आवश्यकतेनुसार नोंद घ्यावी. प्रमुख पाहुणे वा समारंभाचे अध्यक्ष यांच्या भाषणाचा सविस्तर वृत्तांत आला पाहिजे. त्यात शक्यतो मुळातले उद्‌गार अवतरण चिन्हात यावेत. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या विविध गुण-दर्शनाच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्यांची ठळक नावे यावीत. कार्यक्रमाच्या आरंभी स्वागत, प्रास्तविक कोणी केले, हे त्यातील तपशीलासह द्यावे आणि शेवटी आभार कोणी मानले, कार्यक्रम केव्हा संपला, याबाबत फार तर समारोपादाखल एखादे वाक्य यावे.

२) वृत्तांत वाच्यार्थयुक्त शब्दांत असावा. तसेच त्यात कथनात्मकता किंवा निवेदनशैली असावी. शब्दांना सरळ अभिधा-अर्थ असल्याने अर्थाचे अनेक अर्थ न होता सरळ वाचताक्षणी वार्ता उलगडते म्हणूनच अशी साधी, सोपी, आशयाचा वेध घेणारी, हृदयाला भिडणारी सरळ भाषाच वृत्तांत-लेखनात उपयुक्त ठरते.

३) सभा परिषदांचे वृत्तांत लिहितांना सर्वंकष स्वरूपाचे ज्ञान वृत्तांत-लेखकाला असले पाहिजे. सभांना उपस्थित राहून तेथे चालू असलेल्या कामकाजाकडे कोणत्या दृष्टीने पाहावे, याचे सम्यक ज्ञान वृत्तांत लिहिणाऱ्याला असले पाहिजे. त्याला सभा-शास्त्र माहित हवे.

४) विविध वृत्तपत्रांचे- त्यातील अग्रलेख, स्तंभलेख, पुस्तक-परीक्षणे यांचे वाचन सातत्याने वृत्तांत-लेखकाने करणे आवश्यक आहे. पाहुण्यांच्या भेटी-गाठी, मुलाखती, आकाशवाणी, दूरदर्शन इ. माध्यमांतून सादर होणाऱ्या कार्यक्रमांतून वृत्तांत-लेखनास साहाय्यभूत होणाऱ्या गुणांचा परिपोष आपणास करून घेता येईल.

५) वृत्तांत-लेखकाने एक प्रयोग करून पाहायला हरकत नाही, तो म्हणजे आपण स्वतः उपस्थित राहून समक्ष अनुभवलेल्या कार्यक्रमांचे वृत्तांत मुद्दाम सावधानतेने वाचत जावे. त्यातून विविध वृत्तपत्रांतून येणारे एकाच कार्यक्रमाचे वृत्तांत वाचले तर आपणास त्यातील विविध लेखन, कथनशैलीची प्रचीती येऊ शकेल.

६) वृत्तांत लिहितांना आपणास उपलब्ध असलेल्या जागेचे, पृष्ठांचे वा शब्दमर्यादेचे भान ठेवणे आवश्यक आहे.

७) वृत्तपत्रांतून नेहमीच सत्कार, चमत्कार, बलात्कार, होकार, नकार यांच्या बातम्या येतात. त्याचप्रमाणे आग, लाठीमार,

गोळीबार, अश्रुधूर, सभेतील गोंधळ, घात-अपघात, चोरी, दरोडे इ. संदर्भातील प्रकरणांची माहिती येत असते. एक वस्तुपाठ उदाहरण म्हणून त्यांचा अभ्यास करावा.

८) वृत्तांत - लेखकाने निःपक्षपातीपणाने जातीने हजर राहून अनुभवलेल्या गोष्टींच्या आधारे वृत्तांत-लेखन करणे अधिक श्रेयस्कर असते. निदान विश्वसनीय जबाबदार व्यक्तींच्या-कडून ही माहिती मिळवलेली असली पाहिजे. वृत्तातात उल्लेखिलेल्या व्यक्तीच्या मुखातील प्रत्यक्ष उद्‌गार दिल्याने वृत्तांत-लेखन अधिक प्रभावी बनते. त्यात सुसंवादीपणा, जिवंतपणा, अधिकृतता अधिक येण्याची शक्यता बळावते.

९) माहीत असलेला अधिकृत परंतु अचूक, निर्दोष तपशील वृत्तात - लेखकाने पुरविला पाहिजे. तेवढ्यासाठी वृत्तांताची जास्तीत जास्त माहिती करून घेणे आवश्यक आहे.

१०) वृत्तांताविषयी वृत्तांत - लेखकाच्या मनात कोणत्याही प्रकारचा गोंधळ असणे उचित ठरत नाही.

११) वृत्तांत - लेखन हे प्रामुख्याने वाचकांसाठीच लिहावयाचे आहे याचे सतत भान ठेवून लेखकाने मजकुरात सुटसुटीतपणा आणावा. वृत्तांतावर स्वतः लेखकाचा नीट संस्कार व्हावा. आवश्यक त्या ठिकाणी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन बाळगावा.

१२) वृत्तांतातून वाचकांना ज्ञान देता देताच त्याची करमणूकही करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी मित्रत्वाच्या भूमिकेतून लेखकाने वाचकाला माहिती द्यावी, मार्गदर्शन करावे आणि स्वमत प्रतिपादन करावे.

१३) वाचकांना वृत्तांत सरळ कळेल असा देतांना त्याचा गाभा वृत्तांताच्या सुरुवातीलाच द्यावा. या कृतीला प्रस्ताव हा पारिभाषिक शब्द आहे.

१४) वृत्तांतात लिहिताना पाल्हाळ टाळावा. भाषणाचा वृत्तांत लिहिणाऱ्याला सबंध भाषण जसेच्या तसे, अचूक देणे कठीण जाते. मग वेचक विचार, शैलीदार वाक्ये आणि लक्षात राहिलेला व शब्दांत साकार झालाच पाहिजे असा आशय देण्याचा प्रयत्न करावा लागतो.

१५) या सर्व गोष्टींसाठी एकाग्र मनोवृत्ती हा वृत्तांत लेखकाचा अत्यावश्यक गुण आहे.

★ ★ ★

# सारलेखन

## तात्त्विक विवेचन

मराठी, हिंदी, इंग्रजी व सर्व भाषा विषयांच्या अभ्यासक्रमात सारलेखनाचा प्रश्न असतो. सारलेखन हा आपल्या सरावातील एक भाग व्हावा म्हणून या लेखाचे प्रयोजन आहे.

आपल्या संक्षेप कौशल्यावर, आकलनावर आणि लेखन–शैलीवर सारलेखनाचे यश अवलंबून आहे असे लक्षात आल्यावाचून राहात नाही.

भाषेचा व्यवहार, मराठी घटना आणि परंपरा समजावून घेत असताना लेखन, वाचन, भाषण, श्रवण अशा चार अंगांनी भाषेचे ज्ञान होते. सारलेखनात यापैकी वाचन, श्रवण याला अधिक महत्त्व आहे. वाचन–श्रवणातूनच आपल्याला विविध विषयाचे ज्ञान प्राप्त होते. त्यात आपल्या विचारांना चालना मिळते व आपणही स्वतःचे विचार त्यात समाविष्ट करीत असतो. आपल्या भावना आणि संवेदनक्षमतेतून हे सारे घडते. अशा संकलित ज्ञानापासूनच आपण उताऱ्याचे यथार्थ आकलन करू शकतो. आपली स्वतःची भाषाही या अभ्यासातून संस्कारित झालेली असते. इतरांच्या प्रतिपादनातील आशय समजावून घेणे ही मूलभूत गोष्ट सारलेखनासाठी आवश्यक आहे. कारण आकलन (Comprehension) झाले नाही तर त्याचे सारग्रहण (Precis) शक्य होणार नाही, सुयोग्य आकलनाशिवाय सार–लेखन सूत्रबद्धपणे करता येणार नाही. आपल्याला दिलेल्या

उताऱ्यातील समजलेला आशय सूत्रबद्ध रीतीने आपल्याच भाषत मांडणे म्हणजे सारलेखन होय.

आकलनाच्या संदर्भात विवेचन करताना श्री. मंगळूरकर आणि प्रा. अर्जुनवाडकर यांनी आपल्या ग्रंथात कोणत्याही उताऱ्याला पाच अंगे असतात असे सांगितले आहे.

१) विषय २) साध्य ३) हेतू
४) आक्षेप ५) समाधान

यातील विषय, साध्य, हेतू हे तीन महत्त्वाचे घटक कोणत्याही वेच्यामध्ये किंवा उताऱ्यामध्ये आढळल्याशिवाय राहात नाहीत.

तेव्हा आपल्याला सारलेखनासाठी दिलेला वेचा किंवा उतारा प्रथम दोन–तीन वेळा वाचणे आवश्यक आहे. कारण त्याशिवाय त्याचे यथार्थ आकलन होणार नाही. दिलेल्या उताऱ्यातून सर्वसाधारणपणे पुढील गोष्टी समजावून घेतल्या पाहिजेत.

उताऱ्याचा आशय काय आहे, विषय काय आहे, त्या विषयाच्या संदर्भात लेखकाला नेमके काय सांगायचे आहे, या प्रश्नांच्या आधारे आपण उताऱ्यातील नेमका गाभा शोधला पाहिजे. एखाद्या उताऱ्याचे उदाहरणासहित विवेचन केलेले असल्यास आपणास त्यातील मूळ विषय अचूकपणे हेरता आला पाहिजे. त्यासाठी एक प्रतिमा सांगितली म्हणजे अधिक उलगडा होईल. सरकीभोवती भरपूर कापूस असतो. तो कापूस बाजूला सारून सरकी तेवढी हाती घ्यावयाची प्रक्रिया म्हणजेच दिलेल्या उताऱ्याचे सारलेखन होय.

दिलेल्या उताऱ्यातील एकही महत्त्वाचा मुद्दा न गाळता समग्र आशय साररूपाने मांडला जावा, गोवला जावा ही अपेक्षा येथे असते. हा संक्षिप्त वा सार रूपाने मांडला जाणारा आशय म्हणजे केवळ गोळाबेरीज नसावो, तर मुद्देसूदपणे, सलगपणे लिहिलेला तो एक छोटेखानी परिच्छेद झाला पाहिजे. त्यात वाचणाऱ्याला आपण शैलीदार गद्यबंध वाचीत असल्याचा प्रत्यय आला पाहिजे. परस्परांशी संकलित विचारसूत्रे एकजीव करून साध्या, सोप्या, सहज बोलीभाषेत स्वतःच्या खास शैलीत, नेटकेपणाने व काटेकोरपणाने सारलेखन करता आले पाहिजे.

मूळ परिच्छेदातील संपूर्ण आशय स्वतःचा नवा परिच्छेद लिहून अगदी थोडक्यात सांगणे याला सारलेखन असे म्हणतात. अशा लेखनात मूळ उताऱ्यातील भाषेची सजावट, उदाहरणे, विषयांवर संबंधित संलग्न पण दुरान्वित कल्पना, विधाने हे सारे बाजूला सारले पाहिजे. मात्र हे सारे करीत असताना मूळ उताऱ्याच्या आशयातील कमी-अधिक महत्त्व असलेल्या विचारांना धक्का लागणार नाही याचे भान ठेवले पाहिजे. अनावश्यक गोष्टी, अलंकारिकता, विशेषणे, दृष्टान्त टाळावेत हे सारे वगळीत असताना मुद्यांचा क्रम बदलला तरी चालेल. पण त्यात मूळ उताऱ्यात ज्या मुद्यावर अधिक भर असेल त्यावरच अधिक भर असला पाहिजे. विचारांची स्पष्टता, स्वच्छता (Clarity of thought) त्यात असावी. त्यात मूळ उताऱ्यातील पुनरुक्ती नसावी. प्रत्यक्ष संभाषण टाळून सारे अप्रत्यक्ष रीतीने कथन केलेले असावे. म्हणजे मूळ उताऱ्यात संवाद असतील, Direct speech असेल तर संक्षेपात Indirect speech असले पाहिजे. दुधाचे सत्त्व म्हणून लोणी काढावे अशी ही प्रक्रिया आहे असे या लेखकद्वयांनी म्हटलेले आहे.

तात्पर्य, मूळ उताऱ्यातील महत्त्वाचा विचारधागा पकडून उतारा पुरेसा स्पष्ट करणारे संक्षिप्त लेखन म्हणजेच सारलेखन होय. उताऱ्यातील प्रतिपादनाची केलेल्या सारलेखनातून नीट कल्पना करता आली पाहिजे. संपूर्ण उताऱ्याचे मर्म त्यासाठी लक्षात घेतले पाहिजे. उताऱ्याचा विषय, प्रतिपादनाचा रोख, लेखनशैली इत्यादी गोष्टींचे अवधान ठेवावे. सारलेखनाचे हे विवेचनसूत्र पुढील ११ मुद्यांच्या आधारे सांगता येईल. त्याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.

१) दिलेल्या उताऱ्याचे सारलेखन करताना तो उतारा नीट लक्षात येईपर्यंत वाचून त्याचे सार कमीत-कमी शब्दांत सांगितले पाहिजे.

२) सारलेखन करताना दिलेल्या गद्यांशातील मुख्य आशय आणि विचार व्यक्त होणे आवश्यक असते.

३) सारलेखनात अनावश्यक तपशील गाळावयाचे असतात.

४) सार देतांना मूळ उताऱ्यातील प्रतिपादन स्वच्छ व निर्लेप-पणे पण संक्षेपाने सांगितले पाहिजे.

५) सारलेखनात मूळातील पाल्हाळ, ऐसपैसपणा गाळून टाकणे जसे आवश्यक आहे तसेच अल्पाक्षर–रमणीयत्व, मोजकी शब्द–योजना, नेटकेपणा, असंदिग्धता या विशेषांनी युक्त अशा गद्य शैलीतही अचूकपणे आशय समजावून घेतला पाहिजे.

६) सारलेखनाचे वाचन कसे केले पाहिजे याची जाण येण्या–साठी सराव आवश्यक आहे. वाचन कसे करावे याची सारलेखन ही एक कसोटी आहे, पडताळा आहे. अनेकदा आपण बेपर्वाईने,

घाईत वरवरचे वाचन करतो. यालाच 'चाळणे' असेही शिष्टसंमत नाव आहे. त्यामुळे लेखनाचा, दिलेल्या उताऱ्याची नस नीट कळत नाही. उताऱ्यातील आशय गोळाबेरजेच्या स्वरूपातच आपण लक्षात ठेवतो. हे सारलेखनाच्या सरावाने टाळता येईल.

७) सारलेखनासाठी दिलेला उतारा नीट कळावा यासाठी तो एकाग्रतेने, मनःपूर्वक लक्षात ठेवण्याच्या भावनेने वाचला पाहिजे.

८) आपण वाचलेल्या उताऱ्यातील आशयाचे स्मरणपूर्वक, संक्षेपाने कथन करण्याची सवय मनाला लावली पाहिजे. मनाला एकाग्र होण्याची, वाचलेले लक्षात ठेवण्याची शिस्त यामुळे लागते.

९) सावधानतेने, लक्षपूर्वक वाचलेल्या उताऱ्यातील आशयाचे आकलन, ग्रहण, धारण करण्याची कला या सारलेखनाने साधते. याची खऱ्या चोखंदळ रसिकाला नितांत आवश्यकता असते.

१०) सारलेखनाने आपले विचार निःसंदिग्धपणे, सुस्पष्टपणे आणि प्रभावीपणे संक्षेपासह मांडता येतात म्हणून ही कला अवगत असणे हिताचे आहे.

११) यासाठी सारलेखनास दिलेला उतारा दोन-तीन वेळा सावधानतेने लक्षपूर्वक वाचावा. त्या उताऱ्याचा विषय कोणता, लेखकाला काय नमूद करावयाचे आहे, हे नीट समजावून घ्यावे. यामुळे उताऱ्यात काय सांगितले आहे, सांगण्याचा दृष्टिकोन कोणता आहे याची कल्पना येईल. एकाग्र चित्ताने उतारा वाचला तर मर्म ध्यानात येईल. काही वेळा वाक्य तोडून पुन्हा पुन्हा वाचून हे मर्म कळू शकेल. पण एकदा उताऱ्याचे मर्म हाती आले की उताऱ्याचे उत्तम आकलन झाल्यामुळे त्यातील आवश्यक, अढळ वा ग्रहणीय भागाला धक्का न लावता सारलेखन करता येईल.

या सारलेखनात संक्षेप अवतरल्यामुळे हा आपोआपच एक तृतीयांश होईल. मग त्याला अनुसरून अनुरूप व अत्यंत चपखल, समर्पक शीर्षक शोधून द्यावे. सारलेखन शक्यतो स्वतःच्या भाषेत करावे. या पद्धतीने केलेले सारलेखन "थिगळे", विस्कळीत रचनेचे, क्रम विकासरहित होणार नाही. या सारलेखनाच्या मार्गदर्शनाने सारलेखन–कला सहज साध्य होईल याची खात्री वाटते.

एखाद्या तीन पानी लेखाला एका पानात आणणे याला सारलेखन स्थूल मानाने म्हणता येईल.

सारलेखनासाठी उतारा वाचून नीट समजून घेतला पाहिजे. मगच निर्दोष, अचूक संक्षेप शक्य होईल. नेहमी लिहिताना सामान्यांच्या लेखनात एकच गोष्ट शब्द बदलून किंवा मुळातील लेखनशैली पुसून लिहिलेली आढळेल. पण आपण जेव्हा सारलेखन करतो त्यावेळी पुनरुक्ती टाळता आली पाहिजे. वाक्यातील अर्थ, आशय कायम राहून काही शब्द व वाक्प्रयोग वगळता येत असल्यास पाहावे. सारलेखन करताना वाक्यातील मूळ कल्पनाच फक्त विचारात घेतली पाहिजे. त्यावरच सारा भर असावा. पुढे दिलेल्या उदाहरणातून हे स्पष्ट होईल.

"माझ्यावर जरी अनेक दुःखद प्रसंग आले असले तरी माझा एकंदरीत जगाचा अनुभव कटू आहे. जग हे वाईट माणसांनी भरलेले आहे, असा माझा अनुभव नाही. अनेक ठिकाणचे अनुभव असे सांगतात की, दुष्टपणापेक्षा अज्ञान व गैरसमज यांनी तंटे व भांडणे उत्पन्न होतात."

या उताऱ्याच्या काही ओळीत जवळपास पहिले २५ शब्द अनावश्यक आहेत. मुद्दा फक्त एवढाच आहे की, 'जगात दुष्ट–पणापेक्षा अज्ञान व गैरसमज यांनी तंटे व भांडणे उत्पन्न होतात'.

वाक्यातील मुख्य आशयात कोणतीही भर न घालणाऱ्या शब्दांना व पुनरूक्तीला गाळून लांबी कमी करावी लागते. अर्थात सारलेखनात अशी केवळ लांबी कमी करणे अपेक्षित नाही. एकाच परिच्छेदात अनेक संबद्ध, संलग्न कल्पना असल्यास त्यातील फक्त महत्त्वाच्या कल्पना ठेवून अन्य कमी महत्त्वाच्या काढून टाकाव्यात. मात्र परिच्छेदात महत्त्वाचे काय आहे हे जाणले पाहिजे. याचे उदाहरण म्हणून पुढील वाक्य पहा –

'आज आपल्या समाजात धडे व मुंडकी दूरवर पडलेली आहेत. धडाला मुंडके नाही वा मुंडक्याला धड नाही.' या प्रतिकात्मक लेखनातील आशय फक्त सारलेखनात लक्षात घ्यावा. येथे लेखकाला बुद्धिजीवी व श्रमजीवी यातील विभक्तपणा सूचित करावयाचा आहे.

परिच्छेदातून हाती आलेले मुद्दे पूर्ण वाक्यात आपण लिहावेत. प्रत्येक परिच्छेदातील मुख्य मुद्दे अनुक्रमाने लिहावेत म्हणजे संपूर्ण उताऱ्याचे सारलेखन तयार होईल.

संक्षेप-लेखन करण्यापूर्वी उतारा वाचून नीट कळला पाहिजे. त्या उताऱ्याचा विषय कोणता असून त्यात काय सांगितले आहे हे प्रथम समजले पाहिजे. उताऱ्याच्या आशयाची एकूण कल्पना आल्यानंतर मुख्य मुद्यांचा शोध घेण्यासाठी उतारा पुन्हा वाचला पाहिजे. मुख्य मुद्दे मिळण्यासाठी एकेक वाक्य काळजीपूर्वक वाचावे लागेल, तेही अनुक्रमाने. त्यातील तपशील-आशयावर लक्ष केन्द्रित करावे लागेल, काही शब्द वा वाक्प्रचारांचा अर्थ न उलगडल्यास समजून घ्यावा लागेल. त्या सरावाने तुमचा शब्द-संग्रह वाढेल. त्यातील काही शब्द आशयाच्या दृष्टीने महत्त्वाचे असतील.

एकदा उताऱ्याचा संपूर्ण मजकूर लक्षात आल्यानंतर मग योग्य तो मजकूर ठेवून व नको तो मजकूर वगळून सारलेखन करता येते. त्यात सर्व महत्त्वपूर्ण मुद्द्यांचा समावेश झालेला असतो.

तात्पर्य : सुजाण वाचन आणि लेखन यांचा सराव सारलेखनाने होतो.

सारांश वा सारलेखनाच्या पायऱ्या अनुक्रमे पुढीलप्रमाणे दर्शविता येतील.

१) उतारा आरंभापासून अखेरपर्यंत वाचून काढावा. त्यातील एकूण आशय समजून घ्यावा. एकदा वाचून आशयाचा उलगडा झाला नाही तर तो उतारा पुन्हा दुसऱ्यांदा वाचावा. आता उताऱ्याचा विषय काय आहे हे आपल्याला सांगता येईल. त्या विषयाचा विस्तारही सांगता येईल. उताऱ्यातील एकूण कल्पना अल्प व मोजक्या शब्दांत सांगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याचवेळी आपण उताऱ्याला सुयोग्य व समर्पक शीर्षक देण्याच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. एकूण आशयाची समग्र कल्पना देणारे शीर्षक असले पाहिजे. आशयाचीही त्यामुळे चांगली कल्पना येईल.

२) आता पुनः ओळीनिशी उतारा काळजीपूर्वक वाचावा. त्यातील नवीन शब्दयोजना लक्षात घ्यावी.

३) उताऱ्यातील मुख्य मुद्दे क्रमाने लिहावेत.

४) उपरोक्त गोष्टींची टिपणे तयार झाल्यानंतर तुम्ही तुमच्या स्वतःच्या शब्दांत सारलेखन करू शकाल. या सारांशात आता तुम्ही अन्य सर्व तपशील विचारात घेण्याचे कारण नाही. फक्त महत्त्वाचा तपशील निवडूनच सारांशात द्यावयाचा आहे. जर उताऱ्यातील एखाद्या विधानाच्या समर्थनासाठी भरपूर उदाहरणे

दिलेली असतील तर सारलेखनात त्यातील फक्त एक/दोन निवडली तरी चालतील. एखादी कल्पना जर भिन्न शब्दांतून आलेली असेल तर पुनरुक्ती टाळली पाहिजे. मग तुमचा आवश्यकतेपेक्षा थोडा पसरट, तपशीलवार सारांश तयार होईल. जेव्हा आपण अंतीम मुद्दा लिहून तयार करू तेव्हा थोडी लांबी कमी केली पाहिजे. अत्यावश्यक तपशील स्वीकारून असंबद्ध तपशील वगळला याची खात्री झाली की मग हा सारांश तुमच्या शब्दांत लिहिला पाहिजे.

५) पहिल्यांदा सारलेखनाच्या उताऱ्यातील शब्द मोजावेत. सामान्यपणे नेहमीच 1/3 संक्षेप करण्यास सांगितलेले असते. मूळच्या उताऱ्यातील संक्षेपासाठी किती शब्द योजिले पाहिजे ते प्रथम ठरवावे. जर आपले सारलेखन कमी पडत असेल तर तुम्हाला महत्त्वाचे वाटणारे मुद्दे तुम्ही पुनश्च समाविष्ट करू शकाल, जर तो सारांश फार मोठा होत असेल तर त्याची लांबी कमी करण्यासाठी तुम्ही कमी महत्त्वाच्या कल्पना वगळाव्यात किंवा नवी शब्दयोजना करून वाक्यांची पुनर्रचना करावी.

६) लिहिलेला सारांश एकदा वाचावा. त्यात काही वाक्य–रचनेचे, शब्दयोजनेचे दोष वा काही शब्द शुद्ध-अशुद्ध आढळल्यास, सुधारणा, फेरबदल करावेत.

७) यानंतर सारलेखनाचे अंतिम लेखन करावे. सारलेखन करताना दोन गोष्टी मुख्यतः टाळाव्यात.

अ) मूळ उताऱ्यातील वाक्ये पुन्हा जशीच्या तशी देऊ नयेत.

ब) आपण स्वतःच्या पदरचा तपशील त्यात समाविष्ट करू नये. उतारा वाचून उताऱ्याचा विषय काय, त्यातील महत्त्वाचे

परिच्छेद कोणते, त्या परिच्छेदातील मुद्दे कोणते, उताऱ्यातील एकूण मुद्दे कोणकोणते हे पाहिले की सारलेखन सुलभ होते. नमुना म्हणून सारलेखनासह उतारा येथे पुढे दिला आहे.

नमुना उतारा व त्याचे सारलेखन

ज्ञान, त्याग आणि चारित्र्य या गुणांची कोणत्याही समाज-सुधारकाला आवश्यकता असते. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांना हे गुण उपजत अवगत होते व म्हणून गोखल्यांचे स्मरण केवळ औपचारिकपणे न करता त्याचे सद्गुण आज खरोखरीच प्रत्यक्षात आणण्याची गरज आहे.

महात्मा गांधींनी गोखल्यांना गंगेची उपमा दिली आहे. संथ वाहणाऱ्या या जीवनगंगेत सुस्नान करून आपण पवित्र व्हावे. ' गंगेपेक्षा महासागराची उपमा गोखल्यांना विशेष शोभून दिसेल ' असे गोखल्यांच्या जीवनाचे जवळून दर्शन घेतलेल्या चंदावरकर यांचे उद्गार आहेत. आपल्या वयाच्या अवघ्या एकोणपन्नास वर्षांच्या आयुष्यात एक फार मोठे समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ, राजकीय क्षेत्रातील अधिकारी पुरुष म्हणून आपल्या अद्वितीयत्वाने गोखले चमकले. त्यांची सारी जीवनभराची सेवाही अद्वितीयच होती. तो त्यांचा जन्मजात स्वभावच बनला होता. एकही क्षेत्र असे नाही की ज्यात त्यांनी सेवा केली नाही.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गणेश व्यंकटेश जोशी, सार्वजनिक काका, दादाभाई नौरोजी, फिरोज़शहा मेहता, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर या सर्वांपेक्षा गोखले वयाने लहान होते, पण सामाजिक कार्यातील निष्ठा आणि कर्तबगारी याबाबतीत ते मुळीच कमी नव्हते. मानवनिर्मित भेदा-

-पलीकडचे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. म्हणूनच त्यांच्या जीवन-चरित्राला आपण नुसता स्पर्श केला तरी ते आपल्याला लोहचुंबकासारखे ओढून घेते. प्रा. न. र. फाटक यांनी लिहिलेल्या गोखले यांच्या चरित्राला जे 'आदर्श भारत सेवक' हे नाव दिले आहे ते केवळ समाजाचे संस्थापक म्हणून नाही तर सर्वार्थाने गोखले 'आदर्श भारत सेवक' होते हे सांगण्यासाठीच !

आता या उताऱ्याचे शीर्षकासह एकतृतीयांश लेखन नमुन्यादाखल पुढीलप्रमाणे करता येईल.

आदर्श भारत सेवक –

समाजसुधारकाने ज्ञान, त्याग, चारित्र्य या गुणांनी युक्त असावे. नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे सद्‌गुणांनी युक्त होते. याच सद्‌गुणांची जोपासना करण्यासाठी आज नामदार गोखल्यांचे आपण स्मरण करणे आवश्यक आहे.

'आदर्श भारत सेवक' म्हणून गोखल्यानी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात, अद्वितीय कामगिरी बजावलेली आहे. म्हणूनच आजही नामदार गोखल्यांच्या जीवनचरित्राचे आकर्षण वाटतच आहे. प्रा. न. र. फाटक यांनी नमूद केल्याप्रमाणे खरोखरच सर्वार्थाने ते 'आदर्श भारत सेवक' ठरतात.

— ० —

या उताऱ्यात एकूण शब्द सुमारे १५० होते आणि ओळी २१ होत्या. त्याचा एक तृतीयांश म्हणजे ५० शब्द आणि ०७ ओळी असे सांगता येईल. हे मनाशी योजून ठेवले व त्याबेताने दिलेल्या मार्गदर्शनानुसार उताऱ्याचे सारलेखन येथे केले आहे. आणि त्यातूनच 'आदर्श भारत सेवक' हे समर्पक शीर्षक शोधले आहे.

# निबंध लेखन

या लेखात मराठी निबंधाच्या रचनेचा व स्वरूपाचा विचार करावयाचा आहे. सर्वसाधारणपणे निबंधाचे पुढीलप्रमाणे प्रकार कल्पिले जातात.

| | | |
|---|---|---|
| १) वाङ्मयीन | २) कथनात्मक | ३) वर्णनात्मक |
| ४) चरित्रात्मक | ५) वैचारिक | ६) कल्पनाप्रधान |

या निबंधप्रकारांपैकी एक विषय लेखनासाठी विचारला जातो. निबंधासाठी वाचन, निरीक्षण, मनन आणि स्मरणाची गरज असते. निबंध लेखनात शुद्धलेखनालाही महत्त्व असते.

निबंध लेखनापूर्वी निबंधाचा आरंभ, त्याच्या अंतरंगातील, गाभ्यातील मुद्दे आणि शेवट यांची विद्यार्थ्यांनी मनाशी योजना केली पाहिजे. आपल्या मुद्द्याच्या स्पष्टीकरणासाठी विद्यार्थ्यांनी काही उदाहरणे, अवतरणे, म्हणी यांचा सुसंगत वापर करण्याची तयारी ठेवावी. निबंधाचा आरंभ, निबंधातील महत्त्वाचा प्रत्येक मुद्दा आणि शेवट यांचे स्वतंत्र परिच्छेद करावे. निबंधाची सजावट व मांडणी आकर्षक असावी व विषयविवेचन आरंभापासून शेवटपर्यंत मुद्देसूद असले पाहिजे. आकर्षक आरंभ म्हणजे वाचकांना निबंधवाचनासाठी सतत उत्सुकता निर्माण होत राहील, अशी कुतूहलजनक रचना असली पाहिजे. विद्यार्थ्यांनी विषयविवेचनाचे सोयीनुसार ४–५ भाग पाडून लेखन करावे, यालाच परिच्छेदलेखन म्हणतात. निबंधाच्या भाषेत सुबोधता असावी. त्यात शब्दावडंबर नसावे. सहजता असावी. सुभाषिते, म्हणी, वाक्प्रचार, कोट्या, अलंकार, दृष्टांतांची योजना स्वाभाविक व चपखल करावी.

ललित किंवा लघुनिबंध लिहितांना त्यात जमल्यास विनोदनिर्मिती स्वाभाविकपणे व खेळकरपणाने करावी.

निबंधाचा शेवट सूचक आणि चटकदार असावा. पूर्वी विवेचन केलेल्या किंवा येऊन गेलेल्या भागाचा संक्षिप्त सारांश निबंधाच्या शेवटच्या भागात द्यावा. समारोपात आपले काही म्हणणे असल्यास सयुक्तिकपणे पटवून द्यावे लागते.

वर्णनात्मक निबंधात सहली, देखावे, शब्दचित्रे, समारंभ-वर्णन, प्रेक्षणीय स्थळे इत्यादींचा समावेश होतो. उदाहरण म्हणून पुढील निबंध–विषय पहा –

माझे खेडेगाव, चांदणी रात्र, इंद्रधनुष्य, सूर्योदय, सूर्यास्त, वसंतऋतू, पावसाळा, गणेशोत्सव, सभा – सम्मेलन- वृत्तांत, श्रमदान इत्यादी.

चरित्रात्मक निबंधात मोठ्या माणसांची, थोर विभूतींची चरित्रे स्वतःच्या भाषेत लिहावी लागतात. जन्म, बालपण, विद्याभ्यास, उद्योग, कार्य, त्यांच्या जीवनकार्याचे एकूण मूल्य--मापन ह्या गोष्टी चरित्रनायकाची नीट ओळख व्हावी आणि त्या व्यक्तीबद्दलची जिज्ञासा वाचकांच्या मनात निर्माण व्हावी, असा हा निबंध लिहिला पाहिजे. व्यक्तीच्या जीवनकार्यातील ठळक घटना प्रसंगाच्या आधारे परिच्छेद पाडून लिहिता येते. अशा प्रकारच्या निबंधाचे उदाहरण म्हणून गोपाळ गणेश आगरकर, बाळ गंगाधर टिळक, जयप्रकाश नारायण, पु. ल. देशपांडे, आपला आवडता साहित्यिक किंवा नेता या विषयांचा उल्लेख करता येईल.

वैचारिक निबंधात विषयानुरूप प्रस्तावना केली पाहिजे. साधकबाधक प्रमाणांसह विवेचन केले पाहिजे. शेवटी वैचारिक विषयाचे सार काढून मांडता आले पाहिजे. या निबंधाची भाषाशैली तर्कशुद्ध व गंभीर अपेक्षित आहे. आजची शिक्षणपद्धती, खरा रसिक, आंतरराष्ट्रीय युवक वर्ष, शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी. यासारखे निबंधविषय वैचारिक निबंधात मोडतात.

लघुनिबंधाला मात्र कोणत्याही विषयाचे वावडे वा बंधन नसते. त्या विषयाच्या निमित्ताने आपण खेळकरपणे, मिस्किल विनोद–बुद्धी जागृत ठेवून वाचकांना विश्वासात घेऊन, मुक्त मनाने, मात्र आटोपशीर लिहावयाचे असते. नको तो प्रवास, नको त्या परीक्षा, आमचे शेजारी, घड्याळे बंद पडली तर – असे विषय लघु–निबंधाचे असतात.

# आस्वाद - लेखन

आस्वाद–लेखन करताना कवी, लेखक वा दिलेला उतारा यांच्याशी संलग्न अशा वाङ्मयीन वा काल्पनिक गोष्टींचा अनुभव घेतला पाहिजे. त्या उताऱ्याशी संलग्न वा संबद्ध आठवण, प्रसंगवर्णन करायला हरकत नाही. तत्संबंधी एखाद्या मान्यवराच्या विचारांचे सूत्र वा उद्‌गारही ज्ञात असल्यास नोंदवायला हरकत नाही. यानंतर उताऱ्यातील विषयाचा, आशयाचा चिकित्सकपणे विचार केला पाहिजे. त्यात तार्किकता व शास्त्रीयता असली पाहिजे. आस्वाद लेखन करताना अन्य रसिकांना गृहीत धरूनच ते केले पाहिजे. म्हणजे आस्वादाचे आवाहन सर्वाप्रत अधिक पोहोचू शकेल.

प्रारंभी आस्वाद लेखन करतांना दिलेल्या गद्य वा पद्य उताऱ्याकडे रसिकाचे चित्त वेधता आले पाहिजे. शिवाय रसा-स्वादाला अनुकूल अशी मनःस्थिती निर्माण केला पाहिजे. नाट्यारंभी 'रसिक मायबाप हो!' असे संबोधन असते तर वक्ताही श्रोत्यांना अवधान देण्याची विनवणी करीत असतो. 'भ्रमर जैसे परागु नेती' इतक्या हळूवारपणे आणि सुकुमार अंतःकरणाने रसिकांनी काव्याकडे पाहावे असे ज्ञानेश्वर सांगतात.

'शारदियेचे चंद्रकळे । माजी अमृतकण कोवळे ।
ते वेचति मने मवाळे । चकोर तलगे ॥'

ही भाववृत्ती रसिकाने अंगी बाणवल्यावर लेखक, आणि आस्वादक, कलावंत आणि कलारसिक यांच्यात सुसंवाद प्रस्थापित होऊ शकतो. उताऱ्याचे मर्म कळू शकते आणि त्यातील सौंदर्यस्थळांचे रहस्यही जाणकारपणे समजून घेता येईल. दिलेल्या उताऱ्याशी आपण मनःपूर्वक तादात्म्य झालो म्हणजे लेखकाचे मन

आणि आस्वादकाचे मन यांच्यात एक सुसंवाद प्रस्थापित होतो. उतारा कळू लागतो मग आपण एक गद्य वा पद्य वेचा आस्वादित आहोत ही जाणीवही तेथे संपुष्टात येते. आपले नाते त्या उताऱ्यातील अनुभवांशी, त्याच्या पाठीशी असलेल्या त्या साहित्यिकाच्या मनाशी जुळते. अशी रसिकाची दाद देणारी दर्दी भूमिका एकदा तयार झाली की मग त्या उताऱ्याच्या निमित्ताने आपण आशयाचे कल्पना, संवेदना, विचारयुक्त स्पष्टीकरण करू लागतो. हे संवेदना–भावना–विचारांचे सूत्र (मुख्य) हाती येते ते स्पष्ट करावे, त्या मागील कवीमनाची बैठक आणि स्पष्टीकरण सांगावे. मग आढळल्यास त्या उताऱ्यातील भावसौंदर्य, विचार–सौंदर्य आणि भाषासौंदर्य सांगावे. रस, ' कौशल्य सारे रचनेत आहे ' या न्यायाने मांडणी, पद्धती, सूचकता, कलात्मक आणि काव्यात्मक अर्थ, कलात्मक आविष्कार सारे उलगडते. त्यातील जाणीवा आणि जाणलेले स्पष्ट करावे. शब्दाचे सौष्ठव विचारात घेताना शब्द हा विचार परिलुप्त अर्थवाही व आशयघन घटक आहे हे लक्षात घ्यावे व त्या दृष्टीने शब्दांशी निगडित असलेली कवीची जाणीव, रसिकांची जाणीव, कोशातील अर्थ, शब्दाच्या विशिष्ट मांडणीतून अनुभवाच्या संदर्भात व शब्दाशब्दांच्या साहचर्यातून प्रतीत होणाऱ्या अर्थाला स्पष्ट करावे. शेवटी शब्द हे साहित्य–कलेचे माध्यम आहे यांचे भान ठेवावे पण त्यातील व्यंजकता व सामर्थ्य दृष्टिआड होऊ देऊ नये. त्या दृष्टीने विविध अर्थछटा सांगता येतील. असे हे आस्वाद व्यापारातील शब्द–कलेचे महत्त्व आस्वाद–लेखन करताना लक्षात ठेवावे. आवश्यकता वाटल्यास आशयाच्या दृष्टीने अन्य तत्समान लेखनातील किंवा तत्समान लेखकाच्या काही माहितीचाही उपयोग करावा. मात्र हे सारे सुसंगत व अन्वर्थक असावे.

एखाद्या उताऱ्यातील जमेची बाजू दाखवितानाच काही उणिवा वा दोष आढळल्यास त्यांचेही निर्देश करावयास हरकत नाही. मात्र लेखनातून ते सिद्ध व पुरेसे स्पष्ट व्हावे. उताऱ्यातील काय विशेष आवडले. व का, तसेच काय आवडले नाही व का, हे प्रश्न स्वत: विचारले पाहिजेत आणि या प्रश्नांची उत्तरे शोधताना त्यांची सकारण यथोचित शब्दांत मांडणी करता आली म्हणजेच ते आस्वाद-लेखन होते. हे सारे संभवते याचे कारण रसिकाला माणसात, जीवनात आणि त्याचे चित्रण करणाऱ्या साहित्यात रस असतो आणि साहित्यालाही, निर्मात्यालाही माणसांचा आणि जीवनाचा कधीही न संपणारा शोध घेण्यातच स्वास्थ वाटत आलेले आहे.

## काव्य सौंदर्य

कवितेच्या आस्वादाचे विवेचन करताना श्री. मो. रा. वाळंबे यांनी 'कवितेतील सौंदर्य – दर्शन म्हणजेच रसग्रहण' असे म्हटले आहे. काव्य वाचताना आनंद का झाला हे उलगडून सांगणे म्हणजेच आस्वाद–लेखन आणि मनाला मोहून टाकते ते काव्य ! काव्याच्या बाह्य सौंदर्यात तिची रचना किंवा चाल, नाद, कल्पना-प्रतिमांचा विलास, विचारसौंदर्य इत्यादींचा समावेश होतो. उदा. अंगाई गीतात शांत वातावरण निर्माण व्हावे अशी शब्दकळा आणि चाल असते. भूप रागात आळविली जाणारी भूपाळी सकाळच्या प्रहरीच्या मंगलमय वातावरणात कमालीचा गोडवा आणते. भावना आणि रस यांना अनुकूल अशी लय कवितेत असावी लागते, हे कवितेच्या आस्वादात पाहावे लागते. तसेच ध्वनिनादानुकारी शब्दयोजना ( उदा. 'डुमडुमत डमरू ये, खणखणत शूल ये' किंवा 'रुणझुण ये झंकारित वाळा' ) हेही एक सौंदर्यस्थळ

म्हणता येईल. अनुभवाच्या गरजा ओळखून काव्यात भाषा यावी लागते. आशयाला सरळ जाऊन भिडते ती खरी भाषाशैली. मग ते बालगीत, ग्रामीण गीत किंवा कोणत्याही काव्यप्रकारांतील लेखन असो. अंत:करणाची पकड घेणारी, मनाला स्पर्शून जाणारी कल्पना चमत्कृतींनी युक्त रचना इत्यादी गोष्टी काव्यातील सौंदर्याचे दर्शन घडवितांना लक्षात घ्याव्या लागतात.

तात्पर्य, एखाद्या कवितेचे मूल्यमापन करताना पुढील गोष्टी नीट लक्षात घ्याव्यात -

१) कविता वाचून ती नीट समजून घ्यावी.

२) कवितेची मध्यवर्ती कल्पना विशद करावी.

३) कवितेतील भावना, विचारसौंदर्य लक्षात घ्यावे.

४) कवितेतील लय, चाल, शब्दसौष्ठव लक्षात घ्यावे.

५) रुबाया, गझल, कणिका, नाट्यगीत, जानपदगीत, ग्रामीण-गीत, भावगीत, आख्यानपरता, प्रेम, निसर्ग, सामाजिक, विडंबन, विलापिका इत्यादी काव्यप्रकार यांचाही विचार करावा.

६) कवितेतील प्रतिमांचा विचार आशयसंदर्भात करावा.

७) योग्य त्या ठिकाणी पुराव्यादाखल काव्यपंक्ती वा शब्द-रचना नेटकेपणाने उद्धृत करावी.

८) कविता वाचून आपल्या मनावर होणारा एकूण परिणाम (**total effect**) सांगावा. प्रामाणिकपणे आपली प्रतिक्रिया नोंदवावी.

९) कवी आपल्या मनातील आशयाला अभिव्यक्त करून सौंदर्यपूर्ण एकसंध अनुभूती निर्माण करतो. त्यासाठी त्याचे शब्द

विशाल व व्यापक अर्थ प्रकट करतात. हे सारे मर्मज्ञ रसिकाने जाणून काव्यातील व्यंगार्थयुक्त शब्दांकडे पाहिले पाहिजे कारण या शब्द-संहतीतच काव्यार्थ भरलेला असतो.

१०) ही शब्दबंधांची घडण कवितेला, तिच्या घाटाला डौल आणि सौष्ठव प्राप्त करून देते. शब्द प्रतीकांचा अभ्यास हवा.

११) काव्य हा भावनांचा आविष्कार असतो म्हणून शब्द, रूप, रस, गंध, स्पर्श या पंचज्ञानेंद्रियांच्या आधारे या संवेदना रसिकाला जाणवायला हव्यात. रसिकांच्या हृदयात शब्दसंलग्न संवेदना संक्रांत होऊन निर्माण होणाऱ्या सहसंवेदनांची अभिव्यक्ती म्हणजे आस्वाद-लेखन होय.

## गद्य सौंदर्य

गद्याचे प्रमुख वैशिष्ट्य वा लक्षण विचारसंपन्नता होय हे एकदा लक्षात घेतल्यानंतर गद्य उताऱ्याचे आस्वाद-लेखन करताना प्रथम विचारसौंदर्य लक्षात घेतले पाहिजे. या अनुरोधाने इतर गोष्टींचा विचार केला पाहिजे, कारण 'Prose is like a walking & Poetry like a dancing' असे म्हटलेले आहे.

गद्य उताऱ्याचे आस्वाद-लेखन करताना पुढील गोष्टींचा कटाक्षाने विचार करावा :

१) गद्य उतारा व्यवस्थित समजण्यासाठी दोन-तीनदा वाचावा.

२) त्या गद्य उताऱ्यातील विचारांचे सूत्र लक्षात घेण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे एकूण आशयही ध्यानात घ्यावा.

३) गद्य सुद्धा प्रतिभावंत लेखकाच्या मनाचा मुक्त आविष्कार आहे. त्यादृष्टीने लेखकाच्या अनुभवाचा, व्यक्तिमत्त्वाचा,

चिंतनाचा शोध दिलेल्या गद्य उताऱ्यातून घेता आला पाहिजे.

४) गद्य लेखनात आपल्या खास स्वतंत्र शैलीत लेखकाने एखाद्या गंभीर सत्याचा, जीवनमूल्यांचा आविष्कार केलेला असतो. कधी खिलाडू, खेळकरवृत्ती प्रगट होते तर कधी करुण गंभीरतेचा सूर उमटतो. हे सारे व्यवस्थित समजावून घेऊन त्या आशयाच्या दृष्टीने दिलेल्या उताऱ्यातील गद्य-शैलीचा विचार केला पाहिजे.

५) शैलीचा विचार करताना अंत:करणाला सरळ जाऊन भिडते आणि अनुभवाला साक्षात करते ती संपन्न शैली ! तिची आशया–नुरूपता ध्यानात घ्यावी. लेखकाने हे सुचविलेले असते की, 'तुम्ही माझी एक ओळ वाचाल तर हृदयाला हात घालाल !' हाच दृष्टिकोन असावा.

तात्पर्य गद्य उताऱ्यातील विचार, आशय, भाषासौंदर्य, रचना-कौशल्य, कल्पकता, संवेदन-क्षमता, एकूण परिणाम, सौंदर्यदर्शन या गोष्टींचा शोध घेणे म्हणजे गद्य आस्वाद–लेखन होय.

नमुना उदाहरण : पद्य

त्रिधा राधा

आकाश निळे तो हरि
अन् एक चांदणी राधा –
बावरी
युगानुयुगिची मन–बाधा
विस्तीर्ण भुई गोविंद
अन् क्षेत्र साळिचे राधा
स्वच्छंद
युगानुयुगिची प्रियंवदा

जलवाहिनि निश्चल कृष्ण
बन झुकले काठी राधा –
विप्रश्न
युगानुयुगिची चिर-तंद्रा.

– पु. शि. रेगे

## त्रिधा राधा : रसग्रहण –

'सुहृद गाथा' या पु. शि. रेग्यांच्या काव्यसंग्रहातील कविता चाळताना माझं मन खेचून घेतलं हे 'त्रिधा राधा' ह्या कवितेच्या 'त्रिधा' ह्या शब्दाने ! नाविन्यपूर्ण शब्दांची काव्यात उधळण करणारे अन् तरीही मोजक्या शब्दांत हवा तो आशय व्यक्त करणारे, म्हणून रेग्यांची ख्याती आहेच. पण प्रत्यय आला तो काव्यसंग्रह हाती आल्यानंतरच !

खरं पाहिलं तर राधाकृष्णाच्या प्रेमाचा विषय हाच मुळात वेळोवेळी चर्चिला गेलेला आणि जुना झालेला साधाच विषय. त्यातून उण्यापुऱ्या १०–१२ ओळींच्या काव्यात नवीन ते काय सांगणार ? रेग्यांचे काव्यसौष्ठव नजरेत भरते ते अशाच ठिकाणी. पारंपरिक शब्दांत प्रकट करता न येणारा आपला अमूर्त आशय ते वैशिष्ट्यपूर्ण शब्दांनी व्यक्त करतात आणि तसं करताना नकळत आपल्या काव्यशैलीची छाप पाडून जातात.

'त्रिधा राधा' ह्या कवितेत राधा – कृष्णांच्या आदिम प्रतिमांना निसर्ग प्रतिमांचे रूप देऊन शीर्षकात सुचविल्याप्रमाणे राधेची तीन रूपे दाखवली आहेत. निसर्ग प्रतिमांना स्वतःचे रंग, रूप, आकार, स्थिती, गती इ. अंगभूत गुणधर्म लाभलेले असतात.

या गुणधर्मांसह कवितेत त्या निसर्ग प्रतिमा प्रवेश करतात तेव्हा त्यामुळे नकळत एक अनोखा सुंदर अर्थ कवितेला प्राप्त होतो.

" आकाश निळे तो हरी
अन् एक चांदणी राधा बावरी
युगानुयुगीची मनबाधा

निळ्या अथांग अन् विशाल आकाशावर भाळलेली, त्याच्या गूढ विस्तीर्ण दर्शनाने विस्मित झालेली एक सुंदर नाजूक अन् लुकलुकणारी चांदणी. एवढ्या विशाल अन् निळ्याशार रूपावर ती चांदणी भाळली नाही तरच नवल. पण त्याचबरोबर त्याच्या गूढ अंतरंगाला पाहून ती अगदी बावरून गेली. तिला काही सुचेनासं झालं आहे. हे असं होणं खरोखरीच स्वाभाविक आहे. कारण लुब्ध होणे ही प्रेमाची पहिली पायरी आहे. प्रथमदर्शनीच लुब्ध व्हावं पण प्रियकराच्या अंतरंगाचा ठाव न लागल्यामुळे बावरून जावं ही युगानुयुगाची प्रेयसीच्या मनाची झालेली 'मनबाधा' च नाही का !

" विस्तीर्ण भुई गोविंद
अन् क्षेत्र साळीचे राधा
स्वच्छंद
यूगानुयुगाची प्रियवंदा

हीच बावरलेली राधा पुढे स्वच्छंद अन् मनमोकळी झालेली आहे. तिचे बावरलेपण नाहीसे झाले आहे कारण आता ती भुईरूप कृष्णाच्या स्पर्शाने मोहोरलेली, पुलकित झालेली आहे. साळीच्या क्षेत्राच्या रूपात ती भुईरूप कृष्णाच्या वक्षावर आनंदाने प्रेमभराने

डोलते. कृष्णाच्या अंगस्पर्शातून त्याचे प्रेम तिला जाणवल्यामुळेच तिचे प्रेम शिगेला पोचले आहे की जणू त्यांचे युगानुयुगांचे नाते आहे.

पण असे असूनही कृष्णाचे प्रेम अजून अव्यक्तच आहे. ते व्यक्त झाल्याशिवाय त्याची निश्चिती राधेला वाटत नाही तिच्या मनात प्रश्नांचे कल्लोळ उभे राहिले आहेत. त्याच्या मनात आपल्याशिवाय कुणाला स्थान आहे का हे शल्य तिला जाणवतंय पण भेटीसाठी आतुर झालेली बनरुपी राधा जलवाहिनीरूपी कृष्णाच्या अंतरंगात जेव्हा डोकावून पाहते अन् त्यावेळी कृष्णाच्या हृदयात केवळ स्वतःचीच प्रतिमा पाहते तेव्हा तिच्या मनाला असीम आनंद होतो. क्षणार्धात तिच्या मनातले प्रश्न विप्रश्न होतात. अन् भरल्या मनाने ती स्वतःला एक प्रकारच्या तंद्रीत हरवून बसते. प्रेमाच्या सफलतेतून निर्माण होणारी चिरतंद्रा ती हीच. युगानु-युगांपासून असेच घडत आलेलं आहे व पुढेही असेच घडत राहणार आहे.

'त्रिधा राधा' च्या तीन शब्द शिल्पांतून रेग्यांनी घडवलेली राधेची तीन प्रतिमा-युग्मे प्रथमदर्शनी जरी अलग, विलग दिसत असली तरीही त्यामधून प्रेमभावाचे एक विकसनशील प्रवाही व सलग रूप व्यक्त झालेले आहे.

राधेच्या मनोवृत्तीत होत जाणारा बदल हा स्त्री वृत्तीचा द्योतक आहे. कारण सुरुवातीला बावरलेली राधा ही नंतर स्वच्छंद मनाने डोलते आणि नंतर प्रेमाची परिणती सफल प्रेमात झाल्यामुळे विप्रश्न झालेली राधा स्वतःला चिरतंद्रीत हरवून बसते.

रेग्यांच्या कवितेचे खरे वैशिष्ट्य स्त्रीचे नाजूक विभ्रम, नाजूक मुलायम काव्यपंक्तीतून अभिव्यक्त करण्यातच साठलेले

आहे. लहानशा भाववृत्तीचे अंग अंग, कण नि कण उत्कटपणे अनुभवणे व अनुभवाची केवळ निखळ संवेदना वेचणे ही रेग्यांची काव्यवृत्ती. नाविन्यपूर्ण शब्दयोजना करून अर्थसंगती बरोबरच नादसंगतीही ते साधतात.

'त्रिधा–राधो' ही एकच कविता रेग्यांच्या काव्यशैलीचे विविध पैलू दाखविण्यास व त्यांच्या कविमनाची ओळख करून देण्यास पुरेशी आहे.

नमुना उदाहरण : गद्य

श्रावण महिन्यातले सृष्टीचे सौंदर्य पाहून ज्यांचे मन प्रसन्न होत नाही असा कोणी मनुष्य सापडणे शक्य नाही तसे पाहिले तर सृष्टीचे कोणतेही रूप सुंदरच असते. सृष्टीच्या प्रत्येक दर्शनात काही तरी आकर्षक, रमणीय असे असतेच, परंतु ते पाहण्याची रसिकता मात्र पाहिजे. श्रावणातले सृष्टिसौंदर्य इतके स्पष्ट असते की, ते कोणाच्या नजरेतून सुटणे शक्य नाही. सगळीकडे हिरवळ पसरलेली असते. त्यामुळे एरव्ही रुक्ष दिसणारे प्रदेशही सुंदर दिसू लागतात. त्या हिरवळीकडे पाहिले की, सृष्टि-सुंदरी हिरवागार शालू नेसली आहे असे वाटू लागते. हिरवळीत मधून मधून डोकावणारी फुले ही जणू काय तिच्या शालूवर काढलेली नक्षीच आहे असे वाटते. आभाळात इंद्रधनुष्याची कमान पाहून जणु काय नभोमंडपावर हे कोणी तोरणच बांधले आहे असे वाटते.

रसग्रहण :

येथे लेखकाला सृष्टीच्या अनेक रूपांपैकी एका विशिष्ट रूपाचे वर्णन करावयाचे आहे. ते विशिष्ट रूप म्हणजे श्रावणात दिसणारे सृष्टीचे रूप. त्या महिन्यात दिसणाऱ्या ठळक गोष्टींचेच वर्णन येथे आले आहे. हिरवळ, हिरवळीतच डोकावणारी फुलेही येथे नजरेत भरतात. त्यानंतर तोरणासारखे भासणारे इंद्रधनुष्य हा तर श्रावणाच्या सृष्टीतील एक महत्त्वाचा विशेष आहे. उन्हाळ्यात दृष्टीस पडणारे भकास, रूक्ष, दारिद्र्य नाहीसे होऊन सारी सृष्टी आता पार बदलून आल्हादमय झाली आहे. श्रावणातील हे सृष्टिसौंदर्य सर्वांच्या नित्य प्रत्ययाला येणारेच आहे. श्रावणातील या सर्वच सृष्टिसौंदर्याचा परिणाम बालकवींनी आपल्या श्रावण–महिन्यावरील कवितेत वर्णन केला आहे. श्रावणातील हे सृष्टीचे सौंदर्य पाहून बालकवी आनंदाने गाऊ लागतात.

‘ श्रावणमासी हर्ष मानसी । हिरवळ दाटे चोहिकडे ’

❋ ❋

## अभ्यासाची साधने

मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे / ग. ह. केळकर

सुगम मराठी शुद्धलेखन / मो. रा. वाळंबे

मायबोलीचे शुद्धलेखन / य. ए. धायगुडे

मराठीचे व्याकरण / डॉ. लीला गोविलकर

मराठी साहित्य व व्याकरण / मो. स. मोने

मराठी लेखनविकास / अकोलकर, पाटणकर

सुगम मराठी व्याकरणलेखन / मो. रा. वाळंबे

मराठी रचना, घटना आणि परंपरा / मंगरूळकर, अर्जुनवाडकर

पत्रकार / ज. पां. देशमुख

वृत्तसाधना / द्वा. भ. कर्णिक

वृत्तपत्र व्यवसाय / रमेश मंत्री

पत्रविद्या / बा. द. सातोस्कर

Organised Writing / Tickoo & Prabhu

रसग्रहण : कला आणि स्वरूप / गो. म. कुलकर्णी

जास्वंद / माधव आचवल

लावण्यवेल / ल. ग. जोग

मधुघट / संपादक वा. रा. ढवळे

केशवसुत गाऊनि गेले / संपादक वसंत दावतर

अभिव्यक्ती / भास्कर गिरधारी

आलेख / भास्कर गिरधारी

# — शुद्धिपत्र —

(ओळी मोजतांना मथळे वगळावेत.)

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| १ | ५ | लेखन शुद्धीची | लेखनशुद्धीची |
| | ७ | उणिवा | उणीवा |
| | १५ | जाणिवही | जाणीवही |
| २ | ३ | शुद्धाशुद्ध | शुद्धाशुद्ध- |
| | ६ | स्वतंत्रे | स्वतंत्र, |
| ३ | ९ | गोष्टी पुरताच | गोष्टीपुरताच |
| | १० | द्द | द्ध |
| | १८ | सुव्यवस्था | सुव्यवस्था, |
| | १९ | लेखनविष्ठ | लेखननिविष्ट |
| ४ | ७ | या मधून | यांमधून |
| | १४ | दृष्टीने | दृष्टींनी |
| | २३ | शुद्धलेखन विषयक | शुद्धलेखनविषयक |
| ६ | २ | सामान्यरूपावर | सामान्यरूपांवर |
| | १५ | सामान्य रूपांत | सामान्यरूपांत |
| | २१ | लिहावे. | लिहावेत. |
| ८ | १५ | तत्सम शब्द | तत्सम व्यंजनान्त शब्द |
| | २३ | पहावे | पहाणे |
| ९ | १३ | सामान्य रूपांवर | सामान्यरूपांवर |
| १० | ८ | त्याचे | त्यांचे |
| | २० | इष्ट-इष्टच्या | ष्ट-ष्ठ-च्या |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ११ | २ | सुश्रुषा (शुश्रुषा) | सुश्रूषा (शुश्रूषा) |
| १२ | ४ | विशेषणातील 'इत' | विशेषणातील व तद्धितातील 'इत' |
| | ७/८ | या प्रकारच्या विशेषणातील | क. भू. धा. विशेषणातील |
| १३ | २१ | यांच्या | यांचा |
| | | | नियम १० हा नियम ६ चा उत्तरार्ध समजावा |
| १४ | १ | संधी नियमानुसार | संधि नियमानुसार |
| | ७ | द्धि | च्वि |
| | १० | शब्द | शब्दः |
| | १४ | गीतेत | गीतात |
| | १५ | शब्द | शब्दः |
| | | | नियम १६, १७, १५ या क्रमाने वाचावेत. |
| १५ | १४ | लिहावे | लिहावेत. |
| १६ | १६ | तभ्दव | तद्‍भव |
| | १९ | ओष्ट | ओष्ठ |
| १७ | २० | पुन्हा-पुन्हा | पुनः पुन्हा |
| १८ | १४ | सक्षेप | संक्षेप |
| १९ | १२ | क्रमाकाच्या | क्रमांकाच्या |
| २५ | ६ | उद्योगिकरण | उद्योगीकरण |
| | ७ | वैय्याकरणी | वैयाकरण |
| | ११ | षष्ठ्यंब्दी | षष्ट्यब्दी |
| २६ | १६ | माहात्म्य | माहात्म्य, |
| | १७ | प्रेम | प्रेम, |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २६ | १८ | लौकिक | लौकिक, |
| २७ | १० | त्यामध्ये | त्यांमध्ये |
| २८ | ९ | नीतीमत्ता | नीतिमत्ता |
| | १६ | कोणते ? | कोणतं ? |
| ३० | ९ | शास्र | शास्त्र |
| | १३ | त्यानाही | त्यांनाही |
| ३३ | २२ | वृत्ताताचे | वृत्तांताचे |
| ३८ | १० | लेखकाची | लेखकांची |
| ४५ | ६ | राहात | राहत |
| ४६ | १ | भाषत | भाषेत |
| ५५ | ११ | हे | हे ह्या |
| ६० | १४ | परिलुप्त | परिप्लुत |
| | १४ | आशयधन | आशयघन |
| ६१ | २० | मगलमय | मंगलमय |
| | २४ | रुणझुण | रुणुझुणु ये रुणुझुणु ये |
| ६७ | २३ | स्रीचे | स्त्रीचे |
| ६८ | ३ | अर्थसगती | अर्थसंगती |

## प्राचार्य डॉ. भा. व्यं. गिरधारी यांचे प्रकाशित साहित्य

- ☐ अभिव्यक्ती (समीक्षा लेखसंग्रह)
  प्रस्तावना : तात्यासाहेब शिरवाडकर, १९७७
- ☐ आलेख (समीक्षा लेखसंग्रह) १९८०
- ☐ पीएच्. डी. प्रबंध : रूपरेषा आणि निष्कर्ष
  (सहकार्याने संपादित) १९८१
- ☐ महाभारतातील दुर्गास्तोत्र
  (संपादित) १९८२
- ☐ गोपाळ कृष्ण गोखले चरित्र
  (सहकार्याने संपादित) १९८३
- ☐ मराठी 'शुद्ध' लेखनाचा मार्ग १९८५
- ☐ मराठी साहित्यातील 'ययाती' १९८५
  (प्रबंध निष्कर्ष व महाभारताधिष्ठित साहित्यसूचीसह)



प्राचार्य डॉ. भा. व्यं. गिरधारी

## आगामी प्रकाशने

- महाभारतातील कर्ण : मराठी प्रतिभेचा स्पर्श
- वृत्तपत्रसृष्टी आचार आणि विचार
- महानुभावीय
- हसण्यासाठी जन्म आपुला
  (विनोद संचयिका)
- महाभारत कथासंच
- वक्तृत्वकलेची जोपासना
- 'साहित्यिक' नोंदी
- महाराष्ट्रातील पंथोपपंथ
- मराठी लेखनाचा मार्ग (भाग दोन)